# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२६

-------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०२ जुलै, २०२६ / आषाढ ११, १९४८ (शके)**

**(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**
**(२) उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री**
**(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**
**(४) शालेय शिक्षण मंत्री**
**(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**
**(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री**
**(७) वस्त्रोद्योग मंत्री**
**(८) सहकार मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

-------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३४**

-------------------------------------------

### जव्हार (जि.पालघर) येथील कस्तुरबा गांधी निवासी आदिवासी बालिका विद्यालयातील १५ कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवा समाप्तीची नोटीस दिल्याबाबत

**(१) * ९२८४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील कस्तुरबा गांधी निवासी आदिवासी बालिका विद्यालयात ‘समग्र शिक्षा अभियान’ अंतर्गत कार्यरत असलेल्या १५ शिक्षक व शिक्षकेतर कंत्राटी कर्मचाऱ्यांना माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास सेवा समाप्तीची नोटीस दिल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची वेळ आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या २३० विद्यार्थिनी या प्रामुख्याने आदिवासी, अनाथ, अल्पभूधारक शेतकरी व शेतमजुर कुटुंबातील असून, कर्मचारी नसल्यामुळे त्यांच्या निवासी व शैक्षणिक व्यवस्थेत खंड पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अनुभवी शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सेवा सुरक्षेबाबत तसेच विद्यार्थिनींचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने या कर्मचाऱ्यांची पुनर्नियुक्ती किंवा अन्य पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

गोरठण, ता.जव्हार, जि.पालघर येथील केंद्र पुरस्कृत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाकरिता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या १५ पदांपैकी १० कर्मचारी कार्यरत आहेत. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा, दर सहा महिन्यांनी एक दिवसाचा खंड देऊन सुरू ठेवण्यात आल्या आहेत. सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या एकक दराने मानधन अनुज्ञेय आहे.

(२) व (३) पालघर जिल्ह्यात कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाचे प्रकार-२ मधील एकूण ५ विद्यालये आहेत. सदर विद्यालयांमधील कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०४/२०२६ रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील सहा महिन्यांकरीता नवनियुक्ती देण्यात आली असून माहे एप्रिल, २०२६ चे मानधन अदा करण्यात आले आहे.

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांमध्ये मुलींना प्रवेश देणे व इतर कामकाज सुरळीत सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या मिळणेबाबत

**(२) * ९१८५ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या हिशोबाच्या पावत्या गत सात ते आठ वर्षांपासून उपलब्ध करून देण्यात आल्या नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ येथील वेतन पथक अधीक्षक कार्यालयात कार्यरत संबंधित अधिकाऱ्यांनी भविष्य निर्वाह निधीच्या हिशोबाच्या पावत्यांबाबत वारंवार आश्वासने देऊनही प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नसल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक व प्रशासकीय अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने यवतमाळ जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या हिशोबाच्या पावत्या वारंवार आश्वासने देऊनही अद्यापपर्यंत उपलब्ध करुन न देणाऱ्या संबंधित जबाबदार अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच उक्त पावत्या तात्काळ वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) यानुषंगाने अधीक्षक, वेतन व भ.नि.नि पथक (माध्यमिक) यवतमाळ यांचेकडून प्राप्त माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यामध्ये जीपीएफ धारक शिक्षक असलेल्या ३९१ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आहेत. व त्यामध्ये ३०१२ जिपीएफ धारक शिक्षक आहे त्यापैकी आतापर्यंत १५५८ कर्मचाऱ्यांच्या पावत्या वाटप करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित १४५४ शिक्षकांच्या संदर्भात जीपीएफ

पावत्या वाटप करण्याबाबतची कार्यवाही अधीक्षक, वेतन व भ.नि.नि पथक (माध्यमिक) यवतमाळ यांचेकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य विशिष्ट दुकानांतून खरेदी करण्याची सक्ती केली जात असल्याबाबत

**(३) * ९३३८ श्री.सुधाकर अडबाले, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक खाजगी तसेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (CBSE) संलग्न शाळांकडून विद्यार्थ्यांना विशिष्ट दुकान, विक्रेते किंवा वितरण केंद्रामधूनच वह्या-पुस्तके खरेदी करण्याची सक्ती केली जात असून, शाळांनी दिलेल्या याद्यांमध्ये ठराविक प्रकाशक व पुस्तक विक्रेत्यांची नावे नमूद करून पालकांवर आर्थिक बंधने लादली जात असून, पुण्यातील एका खाजगी शाळेच्या आवारातच खाजगी विक्रेत्यांनी विक्री केंद्र उभारून सिनियर के.जी.च्या पुस्तकांसाठी सुमारे ३,७४४ रुपये तर इयत्ता आठवीच्या पुस्तकांसाठी ९,८८१ रुपये एवढे शुल्क आकारण्यात येत असल्याचे दिनांक ६ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजारपेठेतील सर्वसाधारण पुस्तक दुकानांमध्ये वह्या-पुस्तकांवर १० टक्क्यांपर्यंत सवलत मिळत असताना शाळांमार्फत सुचविण्यात आलेल्या विक्रेत्यांकडून कोणतीही सवलत दिली जात नसून, दुकानांमध्ये १२ वहयांचा दर ४०० रुपये असून शाळांमध्ये ९०० रुपये आहे, दुकानात एक वही ३५ रुपयांना तर शाळेमध्ये ७५ रुपयांना मिळते, दहावीसाठीच्या १७२ पानांची एक वही दुकानांमध्ये ३५ रुपयांना असून शाळांमध्ये ७५ रुपयांना आहे, दुकानामध्ये ८० पानांच्या एक डझन वह्यांसाठी २९० रुपयांचा दर असून शाळांमध्ये उक्त वह्या ५४० रुपयांमध्ये मिळतात, अशाप्रकारचे दर शाळेमार्फत सुचविण्यात आलेल्या दुकानांमध्ये असून, विद्यार्थ्यासाठी खाजगी शाळामधून मोठ्या प्रमाणावर वाढीव दराने वह्या पुस्तकांची विक्री करण्यात येत असून त्यावर शासनाचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसून उक्त खाजगी विक्रेते व स्टेशनरी दुकानांमधून विक्री करण्यात येणाऱ्या वह्या व पुस्तकांच्या किंमतीमध्ये तफावत असल्याने पालकांची आर्थिक लूट करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व चौकशीच्या अनुषंगाने खाजगी प्रकाशनांची तसेच NCERT ची स्वस्त व प्रमाणित पुस्तके उपलब्ध असतानाही काही खाजगी व केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (CBSE) शाळांकडून महागड्या खाजगी प्रकाशनांची पुस्तके खरेदीची सक्ती करुन पालकांवर अनावश्यक आर्थिक भार टाकणाऱ्या संबंधित दोषी शाळांविरुध्द तसेच, राज्यातील सर्व खाजगी व CBSE शाळांमध्ये NCERT पुस्तके अनिवार्य करणे, पुस्तक-वह्या विक्रीवरील नियंत्रण यंत्रणा उभारणे, शाळांमध्ये विक्रेत्यांना थेट विक्रीस बंदी घालणे, पालकांसाठी स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करणे व अशा प्रकारच्या सक्तीला प्रतिबंध घालण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना अद्याप पाठ्यपुस्तके उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) शाळांतील विद्यार्थ्यांना गणवेश किंवा इतर शैक्षणिक साहित्य शाळेच्या भांडारातून किवा संस्था/शाळा सांगेल त्या विशिष्ट दुकानांतूनच खरेदी करण्याबाबत सक्ती करणाऱ्या शाळांवर कारवाई करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ११ जून, २००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. राज्य मंडळ, C.B.S.E., I.C.S.E. मंडळाच्या शाळांनी NCERT / SCERT (बालभारतीची) पाठ्यपुस्तके वापरावीत. अन्य मंडळांच्या शाळांनी त्या त्या मंडळांनी प्रमाणित केलेली पाठ्यपुस्तके वापरावीत. कोणत्याही शाळेने विशिष्ट खाजगी प्रकाशनांच्या पुस्तकांचा वापर करण्याचे बंधन / सक्ती विद्यार्थ्यांवर करु नये. तसेच याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी यांनी त्याबाबत शहानिशा करुन तक्रारीमध्ये तथ्य आढळल्यास संबंधित शाळेवर कारवाई करावी, असे निर्देश दिनांक १५/०४/२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील काही खाजगी शाळांकडून ठराविक दुकानातुन महागड्या दराने वह्या-पुस्तके खरेदी सक्तीबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून सदर तक्रारींच्या अनुषंगाने शाळा व्यवस्थापनास नोटीस देण्यात आल्या असून काही शाळांतील वह्या-पुस्तके विक्रीबाबत वर्गखोली देखील सील करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांतील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) * ९०९३ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमधील सुमारे ५ हजार प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी वा त्यासुमारास निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ असोसिएशन्स ऑफ प्रिन्सिपल्स ऑफ नॉन-गव्हर्नमेंट कॉलेजेस' या प्राचार्य संघटनेने सदर पदभरती प्रक्रियेमधील विविध अडचणी, तांत्रिक त्रुटी व व्यवहार्य अंमलबजावणीसंदर्भातील मुद्दे संकलित करून त्याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री व मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राध्यापकांचा विषयनिहाय कार्यभार व प्रत्यक्ष अध्यापन गरज निश्चित न करता केवळ दिनांक १ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या विद्यार्थी संख्येच्या आधारे पदांना मंजुरी देण्यात आली असून, प्रत्यक्ष पदगणना व शैक्षणिक आवश्यकता पडताळणी न झाल्याने सदर निर्णयाबाबत शंका व संभ्रम निर्माण झाला असून प्रत्येक विषयात किमान ५०% पदे भरण्याची जाचक अट असल्यामुळे एकीकडे मंजूर पदांची संख्या अत्यल्प असताना सदर अट पूर्ण करणे अव्यवहार्य असल्याचे प्राचार्य संघटनेचे म्हणणे असून, सदर पदभरतीस वित्त विभागाची अद्याप मंजुरी प्राप्त झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमधील प्राध्यापकांची रिक्त पदे तातडीने भरणे, विषयानुसार वास्तविक कार्यभाराचे पुनर्मूल्यांकन करणे, पदभरती प्रक्रियेतील तांत्रिक व प्रशासकीय अडचणी दूर करणे

तसेच वित्त विभागाची मंजुरी प्राप्त करून शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ११/०२/२०२६ अन्वये राज्यातील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक संवर्गातील ५०१२ रिक्त पदांच्या पदभरतीस मान्यता देण्यात आलेली आहे. या पदांचे समन्यायी पध्दतीने वाटप दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेले आहे.
(२) व (३) सदर पदभरतीस वित्त विभागाची मंजुरी प्राप्त झाली आहे. वित्त विभागाच्या निर्देशानुसार दिनांक ०१/१०/२०२५ रोजीच्या विद्यार्थी संख्येनुसार विषयनिहाय कार्यभार निश्चित करून, शासन पत्र दिनांक २३ मार्च, २०२६ अन्वये महाविद्यालयांना समन्यायी पध्दतीने पदांचे वाटप करण्यात आले आहे. प्रत्येक विषयात किमान ५०% पदे भरण्याची अट सर्व आवश्यक विषयांना किमान शिक्षक उपलब्ध व्हावेत या हेतूने विद्यार्थी हित विचारात घेऊन लागू केली आहे. तसेच, ज्या विषयाला एकही शिक्षक कार्यरत नाही अशा विषयांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत.
(४) सहायक प्राध्यापक संवर्गातील पदभरती करताना संबंधित महाविद्यालयांना समांतर आरक्षण प्रमाणित करुन देणेबाबतच्या सूचना संचालक, उच्च शिक्षण यांनी दिनांक १८/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सर्व कुलसचिव, सार्वजनिक विद्यापीठे यांना दिलेल्या आहेत.

संस्थांना ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी सुधारीत प्रणाली कार्यान्वित केलेली आहे.

पदभरतीच्या अनुषंगाने संस्थांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी आठवड्यातील काही वेळ राखून ठेवणेबाबत संचालक, उच्च शिक्षण यांनी दिनांक १५/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सर्व विभागीय सहसंचालक यांना निर्देश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश न मिळणाऱ्या मुलींना शुल्क माफ करण्याबाबत

**(५) * ८७४७ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेशित मुलींना १०० टक्के शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क माफी देण्याचा निर्णय लागू केला असून, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP Round) मध्ये प्रवेश न मिळाल्यामुळे शैक्षणिक वर्षाचे नुकसान टाळण्यासाठी अनेक विद्यार्थीनींना Against CAP कोट्यातून प्रवेश घ्यावा लागतो मात्र अशा प्रवेशित विद्यार्थीनींना शुल्कमाफी योजनेचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अभियांत्रिकी, वैद्यकीय, फार्मसी, व्यवस्थापन व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी मुलींना पूर्ण शुल्कमाफी लागू केली असतानाही काही महाविद्यालयांकडून प्रशासकीय शुल्क, सुविधा शुल्क अथवा इतर कारणे सांगून विद्यार्थीनींकडून शुल्क आकारले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या शुल्कमाफी धोरणाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित महाविद्यालयांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच येत्या शैक्षणिक वर्षापासून CAP व Against CAP या दोन्ही प्रक्रियेंतर्गत प्रवेश घेणाऱ्या पात्र विद्यार्थीनींना समान पध्दतीने १०० टक्के शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क माफी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.

राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सावर्जनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (Centralized Admission Process-CAP)(व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून देण्यास उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ०८ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(२) व (३) व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थेद्वारे विद्यार्थ्यांकडून कोणत्याही परिस्थितीत शुल्क नियामक प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क आकारण्यात येऊ नये व शासनाच्या योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना लागू असलेल्या शिष्यवृत्तीचा लाभ विचारात घेऊन संस्थांनी प्रवेश देताना शुल्क स्वरुपात आकारु नये, अशा सूचना उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ११/०८/२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये निर्गमित केलेल्या आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) तसेच, इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करणेबाबत योजनेंतर्गत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत (CAP) प्रवेशित विद्यार्थीनींना लाभ देण्यात येतो. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्यतिरिक्त अगेन्स्ट कॅप अथवा संस्थास्तरावर प्रवेशित झालेल्या विद्यार्थीनींना सदरहू योजना लागू नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुलभ करण्याबाबत

**(६) * ८९३९ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी तसेच ग्रामीण भागातील १८ वर्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी आधार कार्ड अद्ययावत करणे बंधनकारक करण्यात आले असताना सुमारे साडेपाच लाख विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अद्याप अद्ययावत झालेले नसल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधार कार्ड अद्ययावत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शालेय प्रवेश, शिष्यवृत्ती योजना, थेट लाभ हस्तांतरण (DBT), परीक्षा अर्ज, शासकीय योजनांचा लाभ, बँक खाते संलग्नीकरण तसेच इतर शैक्षणिक प्रक्रियांमध्ये अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हानिहाय आधार कार्ड अद्ययावत न झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे, यामध्ये ग्रामीण, आदिवासी, दुर्गम व शहरी भागातील विद्यार्थ्यांचे प्रमाण किती आहे, तसेच संबंधित विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अद्ययावत करण्यासाठी शाळास्तरावर विशेष मोहीम, आधार नोंदणी व अद्ययावत शिबिरे, मोबाईल आधार केंद्रे, पालक जनजागृती अभियान तसेच शिक्षण विभाग, UIDAI व स्थानिक प्रशासन यांच्या समन्वयातून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, आधार कार्ड अद्ययावत न झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या कमी करण्यासाठी प्रक्रिया अधिक सुलभ करणे, दुर्गम भागांमध्ये विशेष सुविधा उपलब्ध करणे, शाळांमध्येच आधार कार्ड अद्ययावत केंद्र सुरू करणे तसेच कोणताही विद्यार्थी आधार कार्ड अद्ययावत नसल्याने शैक्षणिक लाभांपासून वंचित राहू नये याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) या विभागाचा शासन निर्णय, दिनांक २१/०४/२०१५ अन्वये शाळांनी प्रवेश दिलेल्या प्रत्येक बालकाचे आधारकार्ड तयार करण्यासाठी दिनांक २७ एप्रिल ते दिनांक २६ जून हा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयाद्वारे प्रवेशित बालकांचे आधारकार्ड तयार करून प्रवेश क्रमांकाशी जोडण्याची कार्यप्रणाली, आधारकार्ड कार्यवाही आणि अहवाल, आधार अभियानाचे प्रबोधन इत्यादी बाबींसंदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत.

आधार अद्ययावत करणे ही प्रक्रिया शाळांमधून शिबिरांच्या माध्यमातून सुरू आहे. आधार कार्ड उपलब्ध नसलेल्या विद्यार्थ्यांची आधार नोंदणी करून घेणे तसेच, विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याची कार्यवाही शाळास्तर व तालुकास्तरावर सातत्याने सुरू आहे.

आधार नोंदणी किंवा अद्ययावत न झालेल्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही योजनेपासून वंचित ठेवण्यात येत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन प्रणालीतील तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत

**(७) * ९६०८ श्री.सत्यजीत तांबे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबईसह अहिल्यानगर, नाशिक, नंदुरबार, धुळे व जळगाव या जिल्ह्यांतील माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन शालार्थ प्रणालीतील तांत्रिक अडचणी, प्रशासकीय दिरंगाई व वेतन अधीक्षक कार्यालयांतील समन्वयाच्या अभावामुळे सलग दोन महिने वा त्याहून अधिक कालावधीपर्यंत विलंबाने होत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यात माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन हे वेतन अधीक्षक कार्यालय, नाशिकमार्फत वितरित करण्यात येते व सदर कार्यालयामार्फत गत आठ महिन्यांपासून वेतन वितरणात सातत्याने विलंब होत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या असून माहे फेब्रुवारी, २०२६ चे वेतन दिनांक १३ मार्च, २०२६ नंतर वितरित करण्यात आले असून, माहे मार्च, २०२६ चे वेतन देयक दीर्घकाळ मंजुरीच्या प्रतीक्षेत राहिल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर गृहकर्ज, वाहनकर्ज व इतर कर्जांचे हप्ते वेळेत भरता न आल्याने त्यांच्यावर बँकांकडून दंडात्मक व्याजाचा अतिरिक्त भुर्दंड पडत असून त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक), नाशिक व वेतन अधीक्षक कार्यालय यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे वेतन वितरण प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कागदपत्रांचे डिजिटलायझेशन, ई-केवायसी, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, शालार्थ पडताळणी व इतर तांत्रिक प्रक्रियांच्या नावाखाली शिक्षक व कर्मचाऱ्यांचे मूलभूत हक्क असलेले वेतन रोखून ठेवले जाते तसेच शून्य शिक्षकी शाळांमधील शिक्षक व कर्मचारी नियमित अध्यापन, परीक्षा व प्रशासकीय कामकाज पार पाडत असतानाही त्यांचे वेतन थांबविण्यात आल्यामुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा वेळेत अदा होण्यासाठी तसेच, शालार्थ प्रणालीतील तांत्रिक अडचणींच्या काळात पर्यायी / समांतर पध्दतीने वेतन वितरण व्यवस्था सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

मुंबईसह राज्यातील अहिल्यानगर, नाशिक, नंदुरबार, धुळे व जळगांव जिल्ह्यातील अनुदानित खाजगी माध्यमिक शाळांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनाकरीता शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिनांक ०७/०४/२०२६ रोजी अनुदान प्राप्त झाले. सदरील अनुदान त्याच दिवशी अधिनस्त सर्व वेतन पथक

माध्यमिक कार्यालयांना वितरीत करण्यात आले. त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन दिनांक १२/०४/२०२६ ते दिनांक २५/०४/२०२६ या कालावधीत अदा करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

i. नाशिक जिल्ह्यातील माध्यमिक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या माहे फेब्रुवारी, २०२६ च्या वेतन देयकामध्ये दिनांक २६/०२/२०२६ च्या पत्रानुसार दिनांक ०१ जुलै, २०२४ ते जानेवारी, २०२५ अखेर घरभाडे भत्ता फरक टॅब उपलब्ध झाल्यामुळे ऑनलाईन प्राप्त वेतन देयक रिजेक्ट करुन पुन्हा मागविण्यात आले. त्यामुळे सदर वेतन देयक दिनांक १२/०३/२०२६ रोजी ई-कुबेर प्रणालीव्दारे संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतन खात्यात जमा झाले आहे.

ii. तसेच, दिनांक ३१ मार्च, २०२६ रोजी वित्तीय वर्ष संपल्याने अनुदान शिल्लक रक्कम शुन्य होऊन नवीन आर्थिक वित्तीय वर्ष दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी सुरु होत असल्यामुळे, माहे मार्च चे वेतन दरवर्षीप्रमाणे वेळेतच पारित झाले असून याबाबत दिरंगाई झालेली नाही.

iii. माहे एप्रिल, २०२६ चे वेतन देयक दिनांक ०६/०५/२०२६ रोजी ई-कुबेर प्रणालीव्दारे संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतन खात्यात जमा झाले आहे.

iv. शालार्थ प्रणालीला संचमान्यता युडायस डाटा जोडला गेल्यामुळे येणाऱ्या तांत्रिक अडचणी किंवा काही शाळांना सन २०२५-२६ ची संचमान्यता प्राप्त न झाल्यामुळे सदर देयके शिक्षणाधिकाऱ्यांच्या लॉगिनला तपासणीसाठी वेतन देयके ऑनलाईन फॉरवर्ड होतात. सदर तांत्रिक अडचणींमुळे येणाऱ्या प्रलंबितता वगळता प्रस्तुत प्रकरणी विहित वेळेत नियमित वेतन देयक पारित करण्यात आली आहेत.

(३) हे खरे नाही.

तथापि, शिक्षण संचालनालयाचे पत्र दिनांक २०/०३/२०२५ व दिनांक १६/०७/२०२५ नुसार शालार्थ प्रणालीवर संच मान्यतेमध्ये मान्य पदांचे मॅपिंग करणे व कर्मचाऱ्यांचे अभिलेखे डिजीटलाईज करणेबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. यासंदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल याचिका क्र.६११२/२०२६ मधील दिनांक ०६/०५/२०२६ रोजीच्या आदेशानुसार डिजीटाईजेशन न केलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ऑगस्ट २०२६ पर्यंत अदा करणेबाबतचे निर्देश संचालनालयाचे पत्र दिनांक २०/०५/२०२६ नुसार निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील गोसीखुर्द प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याबाबत

**(८) * ९१४३ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय खोडके, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) विदर्भातील महत्त्वाकांक्षी गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पाचे भूमिपूजन सन १९८८ मध्ये करण्यात आले असून नागपूर, भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यातील सुमारे २.५० लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा उद्देश असताना भूसंपादन, पुनर्वसन, निधी उपलब्धता व प्रशासकीय समन्वयाच्या विविध अडचणींमुळे

प्रकल्प अद्याप पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाला नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या २९,२३० हेक्टर जमिनीपैकी सुमारे २८,६५९ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली असली तरी उर्वरित भूसंपादनाची प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्यामुळे उप कालवे व उपसा सिंचन योजनांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्य धरणाचे बहुतांश काम पूर्ण झाले असतानाही कालवे व वितरण प्रणाली यांच्यातील समन्वयाअभावी अनेक भागातील शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत प्रत्यक्ष सिंचनाचे पाणी पोहोचलेले नाही, तसेच टेकेपार, आंबोरा, मोखाबर्डी व नेरला यांसारख्या उपसा सिंचन योजनांची कामे पूर्ण होऊनही त्या पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नसल्यामुळे त्यावर कोट्यवधी रुपयांचा खर्च केलेला शासकीय निधी निष्प्रभ ठरत आहे, तसेच प्रकल्पाच्या आराखड्यात वारंवार करण्यात आलेले बदल, भूसंपादनातील अडथळे व विलंब, पुनर्वसन विषयक अडचणी, किंमतवाढ व इतर कारणांमुळे प्रकल्पाचा खर्च ३७२ कोटी रुपयांवरून सुमारे २५ हजार ९७२ कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्पामुळे सुमारे २६८ गावे बाधित झाली असून अंदाजे १४,९८४ कुटुंबांचे पुनर्वसन अपेक्षित असतानाही अनेक विस्थापित कुटुंबांचे पुनर्वसन अद्याप पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने प्रलंबित भूसंपादन, पुनर्वसन, कालवा जाळे, उपसा सिंचन योजना व वितरण प्रणालीची उर्वरित कामे पूर्ण करून शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत तात्काळ पाणी पोहोचविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच भविष्यात अशा मोठ्या सिंचन प्रकल्पांमध्ये होणारा विलंब, खर्चवाढ व पुनर्वसनातील अडचणी व विभागांतील समन्वयाचा अभाव टाळण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

गोसीखुर्द प्रकल्पास सन १९८३ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि, प्रकल्पास १९८८ मध्ये पर्यावरण मान्यता व २००५ मध्ये वनजमीन वळतीकरणाच्या प्रस्तावास मान्यता मिळाली आहे. प्रकल्पांतर्गत ४०.४७ टिएमसी साठवण क्षमतेचे गोसीखुर्द धरणाचे बांधकाम, असोलमेंढा धरणाचे नुतनीकरण व उंची वाढ, गोसीखुर्द धरणाचा ९९.५० कि.मी. लांबीचा उजवा कालवा व २२.९३ कि.मी. लांबीचा डावा कालवा यासह ११ उपसा सिंचन योजना इ. कामे अंतर्भूत होती. प्रकल्पाची अंतिम सिंचन क्षमता सुमारे २.५९ लक्ष हेक्टर आहे. प्रकल्पाची व्याप्ती विचारात घेता, प्रकल्प पूर्णत्वास विलंब झाल्याचे दिसून येते. परंतु सद्य:स्थितीत धरण १००% पूर्ण झाले असून, ८२% सिंचनक्षमता निर्मिती साध्य झाली असून, जून, २०२८ पर्यंत प्रकल्प पूर्णत्वाचे नियोजन करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.

गोसीखुर्द प्रकल्पाकरीता एकूण ३७९९२ हे.आर. जमिनीची आवश्यकता असून, सदर जमिनीपैकी वनजमीन ३१८२.८६ हेक्टर, शासकीय जमीन ५५८६.६२ हेक्टर व २९२२२.०२ हेक्टर खाजगी जमिनीची आवश्यकता आहे. त्यापैकी ३७९३५.९५ हे. आर. (९९.८५%) जमीन संपादित करण्यात आली असून,

उर्वरित ५५.५५ हे. आर. खाजगी जमिनीचे भूसंपादन डिसेंबर, २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. कालवे व उपसा सिंचन योजनांची कामे भूसंपादनाअभावी रखडलेली नाहीत.

(३) हे अंशत: खरे आहे.

या प्रकल्पास सन १९८३ मध्ये रुपये ३७२.२२ कोटीस मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त असून, सन २०२५ मध्ये चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाची व्याप्ती, भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन या विषयक बाबी विचारात घेता, प्रकल्प पूर्णत्वाचे नजीक आहे. धरण, कालवे, वितरणप्रणाली यामध्ये समन्वय असून, सद्यःस्थितीत ८२% सिंचनक्षमता निर्मिती झाली असून, सन २०२५-२६ मध्ये १,३४,१०६ हे. प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळाला आहे. यामध्ये टेकेपार, अंभोरा, मोखाबर्डी व नेरला यामधील अनुक्रमे ५५३० हे., ८६८८ हे., ९२९२ हे., व ६५९६ हे. क्षेत्राचा समावेश आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

या प्रकल्पामुळे सुमारे ८५ गावे बाधित झाली असून, १४,९८४ बाधित कुटुंबांपैकी ८२ गावातील १२,६३८ कुटुंबांचे (८४.३४%) स्थलांतरण पुनर्वसित गावठाणात झाले आहे. नेरला, खापरी (रेह) व रूयाड या तीन गावठाणांचे पुनर्वसन बाकी आहे. त्यापैकी मौजा-रुयाडचे पुनर्वसनाचे काम १००% पूर्ण झाले असून, प्लॉट वाटप झालेले आहे. मौजा-नेरला येथील पुनर्वसनाऐवजी आर्थिक पॅकेजची मागणी असून, प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. मौजा-खापरी (रेह) च्या पुनर्वसनाची निविदा कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(५) प्रकल्प पूर्णत्वाचे नजीक असून, गोसीखुर्द प्रकल्पासाठी PKMKSY व CADWM अंतर्गत पुरेसा निधी देऊन प्रकल्प दोन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजित आहे. भूसंपादन डिसेंबर २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी लवकरात लवकर पोहोचविण्याच्या दृष्टीने जे प्रकल्प प्रगतावस्थेत आहेत, ते पूर्ण करण्याचे व सिंचन क्षमता निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मुंबई विभागीय अध्यक्ष पदावरील नियुक्तीबाबत

**(९) * ९०६२ श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळाचा अतिरिक्त कार्यभार नाशिक विभागीय मंडळाच्या अध्यक्षांकडे सोपविण्यात आला असल्याचे माहे मे,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अध्यक्ष हे मुंबई येथील कार्यालयात नियमितपणे उपस्थित राहत नसल्यामुळे मंडळाच्या प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत असून विभागीय अध्यक्षांच्या अनुपस्थितीमुळे मंडळाची नियमित प्रशासकीय कामे तसेच शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडी संदर्भातील अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईसारख्या मोठ्या प्रशासकीय कार्यक्षेत्र असलेल्या विभागातील कामकाजाकडे विभागीय अध्यक्षांनी केलेल्या हेतुपूरस्सर दुर्लक्षाबद्दल कोणती कारवाई केली तसेच मंडळाचे कामकाज सुरळीत व वेळेत पार पाडण्यासाठी मुंबई विभागासाठी स्वतंत्र पूर्णवेळ विभागीय अध्यक्ष नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दिनांक ०९/०४/२०२६ रोजीच्या आदेशानुसार डॉ. सुभाष रमेश बोरसे यांचेकडे दिनांक १०/०४/२०२६ पासून विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) संबंधित विभागीय अध्यक्ष नाशिक विभागीय मंडळ व मुंबई विभागीय मंडळ कार्यालयात कामकाजाच्या आवश्यकतेप्रमाणे नियमित उपस्थित राहतात. मंडळाचे प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे सुरु असून मंडळाचे कोणतेही नियमित कामकाज प्रलंबित नाही. मंडळाच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) निकालाचे कामकाज विहित वेळेत पूर्ण करून इ.१२ वी परीक्षेचा निकाल दिनांक ०२/०५/२०२६ व इ.१० वी परीक्षेचा निकाल दिनांक ०८/०५/२०२६ रोजी घोषित करण्यात आला आहे.

शासन निर्णय दिनांक ०७ ऑगस्ट, २०२५ नुसार राज्यातील अपात्र शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नावे शालार्थ प्रणालीमध्ये नियमबाह्यरित्या समाविष्ट करून वेतन अदा केल्यासंदर्भात विशेष चौकशी पथक (S.I.T.) स्थापन करण्यात आले आहे. सदर कामकाजासाठी विभागीय अध्यक्ष यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमलेले आहे. सदर कामकाजास विभागीय अध्यक्षांना प्राधान्य द्यावे लागत असल्याने या कामासोबतच यापूर्वीचे तत्कालीन विभागीय अध्यक्ष यांच्या कार्यकाळातील शालार्थ प्रस्तावांवर कार्यवाही सुरू असून त्यांचा निपटारा करण्याची कार्यवाही सुरू असून कोणत्याही प्रकरणात विभागीय अध्यक्षांमार्फत हेतूपुरस्सर दुर्लक्ष करण्यात आले नाही. तसेच मुंबई विभागासाठी पूर्णवेळ विभागीय अध्यक्ष नियुक्त करण्यासाठी शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शाळांना संकलित मूल्यमापन चाचणी प्रश्नपत्रिका वेळेत व पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) * ९४०८ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, अध्ययन स्तर, विषयानुसार आकलन क्षमता, मूलभूत शैक्षणिक कौशल्ये तसेच अध्ययन प्रक्रियेमधील अडथळे ओळखण्यासाठी संकलित मूल्यमापन चाचणी (PAT) राज्यातील

शाळांमध्ये नियमितपणे घेण्यात येत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चाचणीच्या प्रश्नपत्रिका जिल्हा स्तरावरून गटशिक्षणाधिकारी, प्रशासनाधिकारी व तालुका समन्वयक यांच्या देखरेखीखाली संबंधित शाळांपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था असतानाही अनेक शाळांना प्रश्नपत्रिका वेळेत अथवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत तसेच अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शाळांनाही संकलित मूल्यमापन चाचणीच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देण्यात अडचणी येत असून अनेक शाळांना प्रश्नपत्रिका मिळत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रश्नपत्रिका वितरण प्रक्रियेमधील त्रुटी, समन्वयाचा अभाव व नियोजनातील कमतरता, जिल्हास्तरावरील समन्वयातील कमतरता व पुरवठा व्यवस्थेतील अनियमितता लक्षात घेता राज्यातील सर्व प्रकारच्या शाळांना संकलित मूल्यमापन चाचणीच्या प्रश्नपत्रिका वेळेत व मुबलक प्रमाणात उपलब्ध व्हाव्यात, वितरण प्रक्रियेत पारदर्शकता यावी व कोणतीही शाळा संकलित मूल्यमापन चाचणीच्या प्रश्नपत्रिकांपासून वंचित राहू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे,

(२) व (३) हे खरे नाही.

सदर चाचणीचे आयोजन समग्र शिक्षा अंतर्गत राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खाजगी अनुदानित शाळांमधील इ.२ री ते इ.८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी करण्यात येते. चाचणी पत्रिकांचे जिल्हा व तालुका स्तरावरुन वितरण करण्यासाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संपर्क अधिकारी यांची निवड करण्यात आली आहे. सर्व संपर्क अधिकारी यांची वेळोवेळी ऑनलाईन बैठका घेऊन सूचना देण्यात येतात. तसेच वितरणाच्या वेळी संपर्क साधून आढावा घेण्यात येतो. वितरणादरम्यान काही ठिकाणी चाचणी पत्रिका कमी मिळाल्याचे निदर्शनास आणल्यास याबाबत खात्री करुन तात्काळ पोहोचवल्या आहेत. तसेच प्राप्त झालेल्या विद्यार्थी संख्येनुसार तालुकास्तरावर / URC स्तरावर चाचणी पत्रिका वितरीत केल्या जातात. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडून चाचणी आयोजनापूर्वी UDISE+ वरुन तालुका निहाय, माध्यमनिहाय विद्यार्थी संख्या घेण्यात येते. प्राप्त संख्येपेक्षा ५% वाढीव चाचणी पत्रिका प्रत्येक तालुक्याला/URC ला दिल्या जातात. तसेच वितरणाच्या वेळी तालुका संपर्क अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आढावा घेण्यात येत असतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या नियतकालिक मूल्यांकन चाचणी परीक्षेची प्रश्नपत्रिका समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्याबाबत

**(११)** * **८८१५ श्री.योगेश टिळेकर, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या नियतकालिक मूल्यांकन चाचणी (PAT-३) परीक्षेच्या प्रश्नपत्रिका समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी, इंग्रजी व गणित विषयांच्या मूल्यांकनासाठी आयोजित करण्यात आलेल्या या चाचणीच्या प्रश्नपत्रिकांची छपाई पुणे येथील एका खाजगी मुद्रणालयामध्ये करण्यात आली असून, सदर परीक्षा प्रक्रिया अत्यंत गोपनीय असतानांही परीक्षेपूर्वीच मराठी, इंग्रजी व गणित विषयांच्या प्रश्नपत्रिका विविध समाजमाध्यमांवरील सहा चॅनेलद्वारे प्रसारित झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रश्नपत्रिकांची छपाई एका खाजगी मुद्रणालयातून केली जाते आणि तिथून त्या सर्व जिल्ह्यात वितरित केल्या जातात, ही प्रक्रिया अत्यंत गोपनीय असतानाही प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे शिक्षण विभागाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले चौकशीच्या अनुषंगाने प्रश्नपत्रिका विविध समाजमाध्यमांवरील सहा चॅनेलद्वारे प्रसारित झाल्याबाबत संबंधित मुद्रणालय, अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे, अंशत: खरे आहे.

नियतकालिक मूल्यांकन चाचणी (PAT-३) परीक्षेच्या प्रश्नपत्रिका समाज माध्यमांवर प्रसारित झाल्याची बाब दि १३ एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली होती. चाचणी पत्रिकांची छपाई व वाहतूक करण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या विहित कार्यपध्दतीनुसार मुद्रणालयाची व वाहतूकदाराची निवड करण्यात आली असून त्यांच्याशी करारनामा करण्यात आला आहे. करारनाम्यातील अटी व शर्तींच्या अधीन राहून दरवर्षी कामकाज केले जाते. चाचणी पत्रिकांच्या गोपनीयता रहावी म्हणून संकलित चाचणी २ (PAT-३) साठी सीलबंद गठ्ठे तालुका स्तरावर वितरीत करण्यात आले होते. तालुकास्तरावर गोपनीयता राखली जावी यासाठी शाळानिहाय पाकिटे राज्यस्तरावरुन पुरविण्यात आली होती. स्थानिक पातळीवर हाताळणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना दिनांक ०९/०३/२०२६ च्या पत्रान्वये गोपनीयतेबाबत सूचित करण्यात आले होते. सदर चाचणीचे आयोजन उपलब्ध मनुष्यबळ, साधने, निधी व वेळेच्या मर्यादेत करण्यात येते. यासाठी गोपनीयता ठेवण्याचे अधिकतम नियोजन केले जाते.

(४) समाज माध्यमांवर प्रसारित झाल्याची बाब दिनांक १३ एप्रिल, २०२६ रोजी निदर्शनास आल्यानंतर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार विश्राम बाग पोलीस स्टेशन पुणे शहर पुणे येथे तक्रार दाखल करण्यात आली त्यानुसार कलम भारतीय न्याय संहिता (बी एन एस) कलम २२३. भारतीय न्याय संहिता (बी एन एस) २०२३- कलम ३(५) महाराष्ट्र विद्यापीठ, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैर प्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२ _ कलम ५ व ६ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम २०००-कलम ७२ अन्वये दिनांक १३/०४/२०२६ रोजी FIR क्र.०१३० दाखल करण्यात आला आहे. FIR मध्ये नमूद सहा यूट्यूब चॅनलवर नोंदवलेल्या गुन्ह्या संदर्भात पोलीस तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांना मातृभाषा व बहुभाषिक अध्यापन पध्दतीचे प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१२) * ९१९३ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा दर्जा' प्राप्त झाल्यानंतरही राज्यातील सुमारे ८२ टक्के शिक्षक मातृभाषा आधारित शिक्षणाच्या प्रशिक्षणापासून वंचित असल्याचे वास्तव युनेस्कोच्या अलिकडील अहवालातून माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालात प्राथमिक स्तरावरील अनेक शिक्षकांकडे 'बहुभाषिक अध्यापनशास्त्र' (Multilingual Pedagogy) संदर्भातील आवश्यक प्रशिक्षण व कौशल्यांचा अभाव असल्याचे नमूद करण्यात आले असून केवळ पाठ्यपुस्तकांमध्ये मराठी भाषा समाविष्ट असणे पुरेसे नसून शिक्षकांच्या अध्यापन पध्दतीत, संवाद कौशल्यात व विद्यार्थ्यांशी होणाऱ्या प्रत्यक्ष व्यवहारात मातृभाषेचा प्रभावी वापर आवश्यक असल्याचे शिक्षण तज्ज्ञांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ८२ टक्के शिक्षकांना मातृभाषा शिक्षणाचे प्रशिक्षण नसल्यामुळे विद्यार्थ्यांना विशेषतः बोलीभाषेत संकल्पना समजावून सांगताना अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व शिक्षकांना मातृभाषा व बहुभाषिक अध्यापन पध्दतीचे प्रशिक्षण देण्यासाठी विशेष प्रशिक्षण मोहीम, अभ्यासक्रम सुधारणा, SCERT/DIET स्तरावरील कार्यशाळा अथवा डिजिटल प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) नवीन शिक्षण धोरण २०२० नुसार स्थानिक स्वराज संस्थेतील शिक्षकांना शिक्षक मार्गदर्शिका उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर मार्गदर्शिकेत विद्यार्थ्यांमधील पायाभूत साक्षरता विकसित करण्याच्या दृष्टीने वर्गातील बहुभाषिक अध्यापनशास्त्र, अध्यापन कार्यनीती व विद्यार्थ्यांशी होणाऱ्या प्रत्यक्ष व्यवहारात मातृभाषेचा प्रभावी वापर करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचनांचा समावेश आहे. तसेच, शिक्षकांना अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देणे नियोजित आहे. सदर प्रशिक्षणात बहुभाषिकतेच्या अनुषंगाने आवश्यक भाग समाविष्ट करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उध्दभवत नाही.

-----------------

## राज्यात कमी पर्जन्यमानामुळे पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(१३) * ८८०३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रशांत महासागरातील "एल निनो" परिस्थिती सक्रिय झाल्यामुळे राज्यातील मान्सून पर्जन्यमानावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली असून पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी

राहण्याची शक्यता असल्याची बाब दिनांक २३ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संभाव्य दुष्काळजन्य परिस्थिती, अपुरा पाऊस व वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील प्रमुख, मध्यम व लघु प्रकल्पांमधील उपलब्ध पाणीसाठा, भूजल पातळी, जलाशयांची सद्य:स्थिती, टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असलेली गावे, पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई तसेच शेती, पशुधन व औद्योगिक क्षेत्रावर होणाऱ्या परिणामाचा शासनाने सर्वंकष आढावा घेतला आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र व इतर कमी पर्जन्यमान असलेल्या भागांमध्ये आगामी काळात गंभीर पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून अनेक भागांमध्ये भूजल पातळी मोठ्या प्रमाणात खालावली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संभाव्य पाणीटंचाई व दुष्काळजन्य परिस्थितीचा प्रभाव कमी करण्यासाठी जलसंधारण कामांना गती देणे, धरणांतील पाण्याचे नियोजनबध्द व्यवस्थापन करणे, पिण्याच्या पाण्यास प्राधान्य देणे, भूजल पुनर्भरण, टँकर नियोजन, शेतकऱ्यांसाठी सूक्ष्म सिंचन प्रोत्साहन, जनावरांसाठी चारा व पाणी व्यवस्था, तसेच जिल्हानिहाय आपत्कालीन कृती आराखडा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय. हे खरे आहे.

"एल निनो" च्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे हवामान विभागाच्या अद्ययावत दीर्घकालीन अंदाजानुसार देशात एकूणच पर्जन्यमान कमी राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

हवामान खात्याने अल-निनो व आयओडी यांच्या प्रभावामुळे वर्तविलेल्या अंदाजाच्या अनुषंगाने मान्सूनला होणारा विलंब व कमी पर्जन्यमान विचारात घेऊन शासनाच्या जलसंपदा, कृषी व पदूम, मृद व जलसंधारण, पर्यावरण, पाणीपुरवठा, नगरविकास इ. विभागांनी, सर्वंकष आढावा घेऊन आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याबाबत आपल्या अधिनस्त सर्व क्षेत्रिय कार्यालये व यंत्रणांना निर्देश दिलेले आहेत.

जलसंपदा विभागाने शासन पत्र, दिनांक १७/०३/२०२६ आणि दिनांक १२/०५/२०२६ च्या पत्रान्वये, संपूर्ण राज्यभरात भविष्यात आवश्यक असणाऱ्या पेयजलाचे दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत नियोजन करण्याच्या उद्देशाने पाणीसाठ्याच्या वापराबाबत मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश जारी केलेले आहेत. त्याचबरोबर शासन पत्र, दिनांक १३/०६/२०२६ अन्वये, पिण्याच्या पाण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी धरणांमधून सिंचनासाठी प्रस्तावित किंवा सुरु असलेली सर्व पाणी आवर्तने तात्काळ बंद करण्याबाबत आणि पाटबंधारे जलाशयातील उपलब्ध पाणी साठ्याचा आढावा घेऊन, पेयजलाचे दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत नियोजन करण्याच्या अनुषंगाने पाणीसाठ्याच्या वापराबाबत मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत व यासाठी जिल्हास्तरावर कृती आराखडा तयार करण्याचे सर्व क्षेत्रिय कार्यालयांना वेळोवेळी सुचित केले आहे. त्याचबरोबर अनधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा थांबविण्यासाठी भरारी पथक स्थापन करून संबंधितांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

दुष्काळजन्य परिस्थितीचा प्रभाव कमी करण्यासाठी सर्वच विभागाकडून समन्वय साधून कार्यवाही करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांच्या मोफत गणवेश खरेदीसाठी निधी मंजूर करण्याबाबत

**(१४) * ९७२६ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, बूट आणि पायमोजे उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता १४० कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली असून त्यापैकी सुमारे ८४ कोटी (६० टक्के) रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असल्याचे माहे मे,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक सत्राच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश, बूट व पायमोजे उपलब्ध होणे आवश्यक असताना, केवळ ८४ कोटी रुपयांच्या आर्थिक मर्यादेमुळे अनेक विद्यार्थी या लाभापासून वंचित राहिले असून मागील शैक्षणिक वर्षातही निधीअभावी अनेक विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश मिळण्यासाठी स्वातंत्र्यदिनापर्यंत (१५ ऑगस्ट) प्रतीक्षा करावी लागली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन शैक्षणिक सत्रापूर्वी शिक्षकांवर डिजिटल जनगणना आणि बीएलओ कामांची जबाबदारी तसेच प्रशिक्षणाचा ससेमिरा यामुळे गणवेशासाठी कापड निवडणे आणि टेलरशी समन्वय साधणे यासाठी शिक्षकांना वेळच मिळत नसल्याने तसेच समग्र शिक्षा अभियानाचे कर्मचारी संपावर असल्याने यंदा शैक्षणिक सत्राच्या "पहिल्या दिवशी गणवेश" ही संकल्पना कागदावरच राहण्याची शक्यता निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शैक्षणिक सत्राच्या प्रारंभीच विद्यार्थ्यांना गणवेश, बूट व पायमोजे न मिळण्याची कारणे काय आहेत, तसेच विद्यार्थ्यांना वेळेत दर्जेदार गणवेश, बूट व पायमोजे उपलब्ध करून देण्यासाठी व उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने सदर विषयाच्या अनुषंगाने शासनाकडे रुपये १४०.०० कोटी इतक्या निधीची मागणी केली असता वित्त विभागाने अर्थसंकल्पित मंजूर निधीच्या ६० टक्केच्या मर्यादेत रुपये ८४.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला असून याबाबत दिनांक ०४/०५/२०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडे यापुर्वीचे शिल्लक असलेल्या रकमेपैकी रुपये ८४.०० कोटी इतक्या रकमेच्या मर्यादेत निधी खर्च करण्याचे निर्देश दिनांक १९/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले आहेत.

सदरचा निधी खर्च करण्यात यावा व झालेल्या खर्चानुसार निधी वितरणाची मागणी करण्यात यावी, असे संबंधितांना कळविण्यात आले आहे.

तसेच, पीएमश्री अंतर्गत लाभार्थ्यांकरीता रुपये ९.८६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(३) जिल्हा परिषद/महानगरपालिका यांच्याकडील प्राप्त अहवालानुसार ८९.३२ टक्के लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेशाचे वितरण करण्यात आले आहे. तसेच गणवेश पात्र लाभार्थी गणवेशाच्या लाभापासून वंचित राहणार नाही याबाबतची खबरदारी घेण्यात येत आहे.

(४) उर्वरित निधी वितरीत करण्याची आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील साखर उद्योग व ऊस उत्पादक शेतकरी साखर निर्यातीवरील निर्बंधांमुळे आर्थिक अडचणीत आल्याबाबत

**(१५) * १०१८७ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २०० हून अधिक खाजगी आणि सहकारी साखर कारखाने कार्यरत असून सन २०२५-२६ गाळप हंगामात मोठ्या प्रमाणावर साखरेचे उत्पादन झाले असतानाही केंद्र शासनाने साखर निर्यातीवर घातलेल्या निर्बंधांमुळे साखर उद्योग व ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आल्याची बाब माहे मे, २०२६ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखर उद्योगाकडून दरवर्षी उत्पादित साखरेपैकी काही प्रमाणात साखर निर्यातीस परवानगी देण्यात येत असल्याने देशाला परकीय चलन प्राप्त होते, त्यामुळे साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होत असतानाही मागील पाच महिन्यांपासून लागू असलेल्या निर्यात निर्बंधांमुळे राज्यातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यांनी केंद्र शासनाकडे साखर निर्यातबंदी उठविण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने दिनांक ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत साखरेच्या निर्यातीवर घातलेली बंदी वाढण्याची शक्यता असल्याने त्याचा परिणाम राज्यातील साखर उद्योग, ऊस उत्पादक शेतकरी व अर्थव्यवस्थेवर होण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य शासनाने केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) साखर निर्यातीबाबतचे धोरण ही बाब केंद्र शासन स्तरावरील असून केंद्र सरकारने दिनांक १३ मे, २०२६ च्या अधिसूचनेन्वये साखरेची निर्यात तात्काळ प्रभावाने दिनांक ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत किंवा पुढील आदेश येईपर्यंत बंदी घालण्यात आली आहे.

(२) व (३) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील साखर उद्योगाच्या अडचणीसंदर्भात दिनांक २४/०३/२०२६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये केंद्र शासनाच्या अखत्यारित असणाऱ्या विविध मागण्यांवर चर्चा करण्याकरिता राज्याचे शिष्टमंडळ केंद्र सरकारला प्रत्यक्ष भेटून चर्चा करण्याचे ठरले होते. त्यानुसार मा.मुख्यमंत्री महोदयांचे नेतृत्वाखाली नवी दिल्ली येथे मा.केंद्रिय मंत्री (गृह आणि सहकार)

यांच्याकडे दिनांक २७/०५/२०२६ रोजी झालेल्या बैठकीत सहकारी साखर कारखान्याकडील अडचणी विस्तृतपणे मांडल्या असून प्रत्येक अडचणींबाबत केंद्र शासनाकडून लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेणेबाबत मा.केंद्रिय मंत्री (गृह व सहकार) यांनी मान्य केले आहे. त्यामुळे कारखान्यातून निर्मित साखरेला MSP दर वाढविणे, साखर कारखान्यामध्ये उत्पादित इथेनॉलचा दर व कोटा वाढविणे याबाबत केंद्र शासनास विनंती केली असून केंद्र शासनाकडे पाठपुरावा चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील शिक्षण विभागात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत

**(१६) * १०४३७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माध्यमिक शिक्षणाधिकारी, बीड व प्राथमिक शिक्षणाधिकारी, बीड तसेच गटविकास अधिकारी, केज (जि.बीड) यांनी जिल्ह्यात खाजगी बोगस शिक्षक भरती, शालार्थ आयडी घोटाळा व थकीत वेतन व अनुदान वितरण प्रक्रियेमध्ये अनियमितता करून शिक्षण विभागात कोट्यवधी रुपयांचा अपहार केला असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक (SIT) व विशेष चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती, सदर समितीने या दोन्ही अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करुन त्यांना निलंबीत केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित दोन्ही शिक्षणधिकारी यांनी स्वतःच्या किंवा नातेवाईकांच्या नावावर कोट्यावधी रुपयांची अवैध संपत्ती जमा केल्याबाबत स्थानिक नागरीकांनी माहे, जानेवारी २०२६ मध्ये तक्रार केली असून दोन्ही शिक्षणधिकारी SIT अहवालात दोषी आढळल्यानंतरही त्यांच्या वरती गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षक भरती, शालार्थ आयडी, वेतन व अनुदान वितरणातील अनियमिततांबाबत संबंधित शिक्षण संस्था, अधिकारी व इतर संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालक, छ. संभाजीनगर यांनी प्राथमिक चौकशीकरीता गठीत चौकशी समितीने सादर अंतरिम चौकशी अहवालाआधारे दोन्ही शिक्षणाधिकारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई योजिली असल्याने शासन आदेश दिनांक १९/११/२०२५ अन्वये निलंबित करण्यात आले आहे.
(३) व (४) अनियमितता प्रकरणामध्ये शासन निर्णय दिनांक २३/०८/२०१७ अन्वये एकस्तर वरिष्ठ अधिकारी विभागीय शिक्षण उपसंचालक, छ. संभाजीनगर यांच्या स्तरावर सुनावणीची कार्यवाही सुरु असून, सुनावणीच्या निर्णयाअंती अवैध शालार्थ/वैयक्तिक मान्यता प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यात

येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार शिस्तभंगविषयक कारवाईच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात ११ वी च्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत

**(१७)** * **१०५१५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील दोन वर्षांपासून इयत्ता ११ वीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने (Centralized Online Admission Process) राबविण्यात येत असून, या प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांना नोंदणीसाठी वारंवार मुदतवाढ द्यावी लागत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चालू शैक्षणिक वर्षात दिनांक ११ मे पासून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असताना, संकेतस्थळावर अपेक्षेपेक्षा अधिक प्रमाणात वापरकर्त्यांचा ताण (Server Load) आल्यामुळे संकेतस्थळ संथ गतीने कार्यरत असणे, काही वेळा तात्पुरते अनुपलब्ध होणे तसेच प्रवेश प्रक्रियेतील काही तांत्रिक अडचणी उद्भवल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे काही विद्यार्थी व पालकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक, सक्षम व सुरळीत करण्यासाठी शासनाने स्वतंत्र, अद्ययावत व अधिक कार्यक्षम सॉफ्टवेअर प्रणाली विकसित करावी, अशी मागणी विद्यार्थी, पालक, शिक्षणतज्ज्ञ व विविध संघटनांकडून करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया यंत्रणा दोषमुक्त करण्यासाठी आणि प्रवेश प्रक्रिया विनाविलंब पार पाडण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणींच्या अनुषंगाने शासन स्तरावर निवेदने प्राप्त झाली होती. या निवेदनांच्या अनुषंगाने प्रवेश प्रक्रियेत सुधारणा करण्यात आली आहे. तसेच पोर्टलवर निर्माण होणाऱ्या अडचीणींबाबत माध्यमिक संचालक कार्यालयाने दखल घेती असून याबाबत कंपनीस तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी निर्देश दिले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी दिनांक २७ एप्रिल, २०२६ च्या शासन निर्णयान्वये प्रवेश प्रक्रियेची संपूर्ण माहिती व मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. ही प्रवेश प्रक्रिया विहीत कालावधीत पार पाडण्यासाठी यावर्षी इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे पोर्टल ११ एप्रिल पासून विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी खुले करण्यात आले होते.

प्रवेश प्रक्रियेतील पहिली फेरी सुरु केल्यानंतर संपूर्ण राज्यातून विद्यार्थी नोंदणी एकाच वेळी केल्यामुळे संकेतस्थळावर ताण येऊन थोड्या कालावधीसाठी संकेतस्थळ संथ गतीने कार्यरत असणे ही समस्या निर्माण झाली होती. याबाबत संचालनालयाने तातडीने संबंधित कंपनीकडे पाठपुरावा करुन यावर तात्काळ उपाययोजना करुन त्रुटींची पूर्तता केली होती. त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेचा नोंदणी अर्ज भरण्याकरीता वाढीव कालावधी देण्यात आलेला होता. तद्नंतर प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली असून अद्यापपर्यंत संकेतस्थळाबाबत कोणतीही अडचण निर्माण झालेली नाही.

सद्यास्थितीत इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची शून्य फेरी, पहिली व दुसरी नियमित फेरी सुरळीतपणे पार पडली आहे. तसेच दिनांक १७/०६/२०२६ पर्यंत एकूण नोंदणी केलेल्या १३,७६,४४९ विद्यार्थ्यांपैकी ६,३५,०२६ विद्यार्थ्यांनी या प्रक्रियेद्वारे त्यांचे प्रवेश निश्चित केले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील मराठी भाषेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राचा निकाल प्रलंबित असल्याबाबत

**(१८) * ९२९४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या मराठी भाषेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राचे निकाल माहे एप्रिल, २०२६ पर्यंत जाहीर करण्यात आले नसतानाही द्वितीय सत्राच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झालेले असून प्रथम सत्राचा निकाल अद्याप प्रलंबित असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम, मानसिक तणाव व शैक्षणिक अनिश्चितता निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या मराठी भाषेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राचे निकाल जाहीर करण्यात होत असलेल्या विलंबामुळे विद्यार्थ्यांमध्ये विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन व्यवस्थापनाबाबत विद्यार्थ्यांमधून तीव्र नाराजी व संताप व्यक्त करण्यात येत आहे, तसेच मराठी भाषेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या सत्राचे निकाल अद्यापही न लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या मराठी भाषेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या सत्राचे निकाल जाहीर न करणाऱ्या व विद्यापीठाच्या या गैरव्यवस्थापनाबाबत संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच मराठी भाषेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या सत्राचे निकाल जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठाच्या दुरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील मराठी भाषेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राचा निकाल दिनांक २९ एप्रिल, २०२६ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. तसेच सदर अभ्यासक्रमाच्या द्वितीय सत्राच्या परीक्षा या सुधारित वेळापत्रकानुसार दिनांक १६ जून २०२६

पासून घेण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कोणत्याही प्रकारची संभ्रमावस्था व अनिश्चितता निर्माण झालेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची थकीत देयके अदा करण्याबाबत

**(१९) * ९१२२ श्री.किरण सरनाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची थकीत वैद्यकीय व इतर देयके दिनांक ३० मार्च, २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करणे अनिवार्य करण्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मागील पाच ते सहा वर्षांपासून संबंधित कर्मचाऱ्यांची थकीत वैद्यकीय व इतर देयके विहित मुदतीत सादर करूनही संबंधित देयकांसाठी शिक्षणाधिकाऱ्यांकडून नादेय प्रमाणपत्र मागणे, त्रुटीपूर्तता करूनही त्याच कारणांवरून वारंवार देयके परत पाठविणे अथवा नाकारणे अशा प्रकारच्या अनेक तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची थकीत देयके दीर्घकाळ प्रलंबित राहून संबंधितांना रक्कम न मिळण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची थकीत देयके तात्काळ अदा करण्यासाठी विशेष शिबिर आयोजित करुन नादेय प्रमाणपत्र, अतिरिक्त मंजुरी अथवा अनावश्यक प्रशासकीय अटी न लावता सदर देयके त्वरीत निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) संचालक (प्राथमिक) व संचालक (माध्यमिक) यांच्या दिनांक १२/९/२०२५ व दिनांक १९/११/२०२५ रोजीच्या पत्रानुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील अनुक्रमे नियमोचित वैदयकीय देयके ऑनलाईन पध्दतीने अदा करणेबाबत व इतर थकीत देयके ऑनलाईन पध्दतीने सादर करणेबाबत सर्व अधिनस्त कार्यालयांना विस्तृत सूचना दिलेल्या आहेत.
(२) व (३) संचालक (प्राथमिक) व संचालक (माध्यमिक) कार्यालयांमार्फत विहीत कार्यपध्दतीनुसार वेळोवेळी सर्व प्रकारची थकीत देयके अदा करण्यात येतात. सन २०२५-२६ मध्ये शालार्थ प्रणालीमध्ये वैद्यकीय व इतर अशी एकूण २९२२१ (प्राथमिक) देयके सादर झाली आहेत. प्राथमिक संचालनालय व अधिनस्त कार्यालयामार्फत एकूण १७२८९ इतकी देयके मंजूर करण्यात आलेली असून, एकूण ५४९३ देयके त्रुटी असल्याने नामंजूर आहेत. तसेच ६४३९ देयके प्रलंबित असून त्यावर कार्यवाही सुरू आहे. तसेच, सन २०२५-२६ मध्ये शालार्थ प्रणालीमध्ये वैद्यकीय व इतर अशी एकूण १३६८२६ (माध्यमिक) देयके सादर झाली आहेत. माध्यमिक संचालनालय व अधिनस्त कार्यालयामार्फत एकूण ६३७३१ देयके मंजूर करण्यात आलेली असून, एकूण ३९९८१ देयके त्रुटी असल्याने नामंजूर आहेत. तसेच ३३११४ देयके प्रलंबित असून त्यावर कार्यवाही सुरू आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासीबहुल जिल्ह्यांतील १७ हजार शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत

**(२०)** * **९३३७ श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १३ आदिवासीबहुल जिल्ह्यांमधील अनुसूचित क्षेत्रातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये सुमारे १७ हजार शिक्षकांची पदे रिक्त असल्याने दुर्गम व आदिवासी भागातील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असून अध्यापनाची गुणवत्ता, विषयवार शिक्षक उपलब्धता, विद्यार्थ्यांची उपस्थिती व शैक्षणिक प्रगती यामध्ये मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे माहे एप्रिल, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) उत्तीर्ण होऊनही मोठ्या संख्येने पात्र आदिवासी उमेदवारांना नियुक्ती मिळालेली नसल्यामुळे ते रोजगारापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही जिल्ह्यांमध्ये मर्यादित प्रमाणात शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्यात आली असताना अनेक आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये भरती प्रक्रिया अद्याप प्रलंबित असल्यामुळे शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये विसंगती, समन्वयाचा अभाव व प्रशासकीय दिरंगाई दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुसूचित क्षेत्रातील सुमारे १७ हजार रिक्त शिक्षक पदे भरणे, स्थानिक पात्र आदिवासी उमेदवारांना प्राधान्य देणे, दुर्गम भागांसाठी विशेष भरती मोहीम राबविणे व शिक्षक टिकविण्यासाठी विशेष प्रोत्साहन योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाने पेसा कायद्यानुसार विहित करण्यात आलेल्या आरक्षणानुसार पदभरती करण्यास स्थगिती दिली असल्याने या क्षेत्रातील नियमित पदभरती काही काळ रखडली होती, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होऊ नये यासाठी सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी नियुक्ती, पात्र उमेदवारांची मानधन तत्वावरील नियुक्ती इत्यादी मार्गांचा अवलंब करण्यात आला.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने पेसा क्षेत्रात पूर्वीच्या आरक्षणाच्या तुलनेत ५० टक्के मर्यादेत पदभरती करण्यास मुभा दिल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११/०२/२०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व दिनांक ०४/०५/२०२६ रोजीच्या पत्रातील निर्देशानुसार मानधन तत्वावर कार्यरत पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात येत आहे.

(३) पेसा क्षेत्रातील पदभरती मा.सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम न्यायनिर्णय व त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाने दिलेले निर्देश यानुसार करण्यात येत आहे.

(४) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या आरक्षण मर्यादेत सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशानुसार शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी सन-२०२५ मधील गुणांच्या आधारे पात्र उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केली जाणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## कला संचालनालयातील असिस्टंट प्रोफेसर पदाच्या सरळसेवा भरती प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(२१) * ९८०५ श्री.विक्रम काळे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कला संचालनालयातील असिस्टंट प्रोफेसर, गट-अ या पदांच्या सरळसेवा भरतीसाठी माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार जून-जुलै, २०२५ मध्ये मुलाखती घेण्यात येऊन ७९ पदांपैकी ५८ उमेदवारांची निवड करण्यात आली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवड यादीबाबत नागपूर येथील काही उमेदवारांनी आक्षेप नोंदवून तक्रार दाखल केली होती व त्यानुसार प्राथमिक पडताळणीत निवड यादीतील अनेक उमेदवारांच्या पात्रतेबाबत शंका उपस्थित करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवड यादीतील काही उमेदवारांनी अनुभव प्रमाणपत्रे, शैक्षणिक पात्रता अथवा अन्य आवश्यक कागदपत्रांबाबत चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळलेल्या उमेदवार, संबंधित अधिकारी अथवा अन्य जबाबदार व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत तसेच कला संचालनालयातील असिस्टंट प्रोफेसर, गट-अ संवर्गातील रिक्त पदे नियमित व पारदर्शक सरळसेवा प्रक्रियेद्वारे तात्काळ भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) शासनास अशा विवक्षीत तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत परंतु महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तसेच या भरतीबाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे दाखल झालेल्या मूळ अर्जाबाबत न्यायाधिकरणाने पारित केलेल्या आदेशांत शासनाने तपासणी करण्याबाबत निदेश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने दिनांक १७ मार्च, २०२६ च्या शासन निर्णयान्वये कुलगुरु, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली होती. सदर समितीने दिनांक १० एप्रिल, २०२६ रोजी शासनास अहवाल सादर केला आहे. चौकशी अहवालानुसार पात्र ठरलेल्या ४१ उमेदवारांना दिनांक २२ मे, २०२६ च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच उर्वरीत उमेदवारांबाबत पुढील नियमोचीत कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सोयाबीनला किमान आधारभूत किंमत कमी दिल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याबाबत

**(२२) * ८७४९ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने देशभरातील एकूण सोयाबीन उत्पादनापैकी सुमारे १५.८७ टक्के तर महाराष्ट्रातील केवळ १२.५४ टक्के सोयाबीन किमान आधारभूत किंमत (MSP) दराने खरेदी करण्यात आली असून महाराष्ट्रातील सोयाबीन खरेदीचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बहुतांश सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना शासनाच्या खरेदी केंद्रांवर वेळेत नोंदणी, हमीभावाने खरेदी व पुरेशी साठवण सुविधा उपलब्ध न झाल्यामुळे खुल्या बाजारात एमएसपीपेक्षा कमी दराने सोयाबीन विक्री करावी लागली असल्यामुळे शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल किमान रुपये ७०० पर्यंत आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिस्थितीमुळे महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे एकूण सुमारे रुपये २,३५० कोटींचे आर्थिक नुकसान झाल्याने सोयाबीन उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून त्यांना दिलासा देण्याकरीता शासनाने विशेष आर्थिक पॅकेज, बोनस, अनुदान अथवा प्रतिक्विंटल भरपाई जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने हंगाम २०२५-२६ मध्ये सोयाबीनची हमीभावाने खरेदी प्रक्रिया राबविणेकरीता राज्यासाठी १८,५०,७०० मे.टन सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. राज्याला दिलेल्या उद्दिष्टांपैकी एकूण २,३८,९१६ शेतकऱ्यांचा ६,०२,०४८ मे.टन सोयाबीन किमान हमीभाव योजनेंतर्गत खरेदी करण्यात आला आहे.

तथापि, हंगाम २०२५-२६ मधील सोयाबीन खरेदी कालावधीच्या दरम्यान खुल्या बाजारात सोयाबीनचे दर वाढल्याने शेतकऱ्यांनी हमीभावापेक्षा खुल्या बाजारात विक्री केली.

(२) हे खरे नाही.

हंगाम २०२५-२६ मध्ये राज्यात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिनांक ३०/१०/२०२५ ते ३१/०१/२०२६ या कालावधित नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आली होती. या अंतर्गत एकूण ९३४ केंद्र कार्यान्वित करण्यात आली होती. तसेच खरेदी करण्यात आलेला शेतमाल वखार महामंडळाने दिलेल्या निर्देशानुसार साठवणूक करण्यात आला आहे. नोंदणी, खरेदी व साठवणुकीस कोणतीही अडचण आलेली नाही. व त्यासंदर्भी खरेदीदार संस्थेकडून कोणतीही तक्रार नोंदवली गेली नाही.

किमान आधारभूत योजनेंतर्गत कडधान्य व तेलबिया साठवणूकीसाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची स्वमालकीची २०५ वखार केंद्र असून त्याअंतर्गत एकूण ९९४ गोदामे आहेत. सद्य:स्थितीत वखार महामंडळाची साठवणूक क्षमता एकूण १९.३८ लाख मे.टन आहे.

(३) शासनामार्फत केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत कडधान्य व तेलबिया या शेतीमालासाठी हमीभाव योजना राबविली जाते.

शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून सदर योजनेंतर्गत खरेदीसाठी मुदतवाढीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे दिनांक २४/०२/२०२६ च्या पत्रान्वये पाठविण्यात आला होता.तथापि, दरम्यानच्या कालावधीत खुल्या बाजारात सोयाबीनचे दर वाढल्याने शेतकऱ्यांनी हमीभावापेक्षा खुल्या बाजारात विक्री केली. त्यामुळे आर्थिक पॅकेज, बोनस, अनुदानचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील बेरोजगार तरुणांसाठी प्रभावी रोजगार मेळावे आयोजित करून स्थानिक रोजगाराच्या संधी वाढविण्याबाबत

**(२३)** * **९६०७ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये कौशल्य विकास विभागामार्फत आयोजित केलेल्या रोजगार मेळाव्यांना बेरोजगारांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही तसेच जिल्ह्यात एकूण १४,५४७ बेरोजगार तरुणांनी नोंदणी केली असून ४६ कंपन्यांकडून १,८३३ रिक्त पदे उपलब्ध करुन देण्यात आली असतानाही प्रत्यक्ष मेळाव्याला केवळ १,११७ उमेदवार उपस्थित राहिले व त्यापैकी फक्त २५५ जणांनाच नियुक्तीपत्रे मिळाली असून अपंग उमेदवारांसाठी आयोजित विशेष मेळाव्यातही १८८ रिक्त पदांच्या तुलनेत केवळ ५९ जणांना नियुक्ती मिळाली असून मोठ्या संख्येने नोंदणीकृत महिला व पुरुष उमेदवार अद्याप रोजगाराच्या प्रतीक्षेत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये मिळणारे कमी वेतन, कामाचे प्रतिकूल स्वरूप आणि सोयी-सुविधांचा अभाव यामुळे बेरोजगार तरुण मुंबई-पुणे यांसारख्या शहरांकडे स्थलांतरित होत असल्याने मेळावे निष्प्रभ ठरत आहेत व कौशल्य विकास योजनेच्या निधी / नियोजनाचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमआयडीसीच्या विस्ताराअभावी मोठ्या व उच्च वेतन देणाऱ्या कंपन्यांची कमतरता असल्याने उपलब्ध असलेल्या कामाच्या स्वरूपाबाबत तरुणांमध्ये असलेल्या उदासीनतेमुळे शासकीय रोजगार नोंदणीकृत बेरोजगारांच्या तुलनेत प्रत्यक्ष नियुक्तीचे प्रमाण अत्यल्प राहून बेरोजगारीची समस्या अधिक तीव्र होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने जिल्ह्यातील रोजगार मेळाव्यांचा प्रतिसाद वाढवण्यासाठी, स्थानिक स्तरावर उच्च वेतनाच्या नोकऱ्या निर्माण करण्यासाठी, उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी (विशेष सवलती/पॅकेजेस), एमआयडीसी विस्तार गतीमान करण्यासाठी व उद्योगांच्या गरजांनुसार कौशल्य प्रशिक्षणाचे पुनर्रचना (industry-aligned curriculum) करण्यासाठी व स्थानिक उद्योगांच्या गरजांनुसार नवीन प्रशिक्षण धोरण राबविण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

संबंधित आस्थापनांना आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव असलेले उमेदवार उपलब्ध न झाल्यास रोजगार मेळाव्यांमध्ये अधिसूचित करण्यात आलेली पदे रिक्त राहतात.

(४) दिनांक ०४/०१/२०२६ च्या शासन निर्णयानुसार शासनामार्फत आयोजित करावयाच्या रोजगार मेळाव्यांच्या समन्वयासाठी राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

उद्योग विभागाच्या दिनांक १६/०९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये समूह प्रोत्साहन योजना-२०१९ जाहीर करण्यात आली असून औद्योगिक विकासासाठी प्रोत्साहनपर सवलती देण्यात येत आहेत.

राज्यातील उमेदवारांना अत्याधुनिक तंत्रज्ञानानुरुप कौशल्य प्रशिक्षणाच्या आधारे रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने कौशल्य विकासाच्या विविध योजना राबविण्यात येतात. दिनांक २०/०८/२०१९ च्या शासन निर्णयाद्वारे राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकास संदर्भातील योजनांचे एकसूत्रिकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित विभागांना महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या एकात्मिक वेबपोर्टलवर उपलब्ध असलेले अभ्यासक्रम राबविणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच, सदर अभ्यासक्रमांव्यतिरिक्त इतर अभ्यासक्रम राबवावयाचा असल्यास त्यास महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची मान्यता घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खासगी शिकवणी वर्गांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याबाबत

**(२४) * १०२९५ डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या शिक्षण विभागामार्फत राज्यातील शालेय व उच्च शिक्षण व्यवस्थेसाठी शिक्षकांची पात्रता, पायाभूत सुविधा, शुल्क नियंत्रण व इतर बाबींसंदर्भात नियमावली लागू करण्यात आलेली असताना राज्यभरात मोठ्या प्रमाणावर "अकॅडमी", "कोचिंग क्लासेस" व "ट्युशन संस्था" कार्यरत असून त्यांच्या शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रता, अध्यापन गुणवत्ता, शुल्क आकारणी, विद्यार्थ्यांची सुरक्षितता तसेच आर्थिक व्यवहारांवर शासनाचे प्रभावी नियंत्रण नसल्याने वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांच्या (नीट, जेईई) संदर्भातील पेपरफुटी प्रकरणाच्या गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर खासगी शिकवणी वर्गांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कायदा लागू करण्याची मागणी विविध स्तरांतून करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थांमध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी किमान शैक्षणिक पात्रता, अनुभव व गुणवत्ता निकष निश्चित करून त्यांची पडताळणी करण्याची व्यवस्था निर्माण झाली असून विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत पारदर्शकता आणण्यासाठी शुल्क संरचना जाहीर करणे, पावती देणे बंधनकारक करणे तसेच अवाजवी शुल्क आकारणीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्याबाबत शासनाचा विचार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही खासगी शिकवणी वर्गांकडून राबविण्यात येणाऱ्या ‘इंटिग्रेटेड’ व ‘टाय-अप’ पध्दतीमुळे कनिष्ठ महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती शून्य राहत असल्याने विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीवर परिणाम होत असल्याच्या तसेच काही क्लासेसनी संगनमताने बोगस उपस्थिती दाखवून अकरावीचे प्रवेश घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोचिंग क्लासेसच्या या अनधिकृत व्यापारीकरणामुळे आणि स्पर्धा परीक्षांच्या वाढत्या दडपणामुळे माध्यमिक शिक्षणाचे व विद्यार्थ्यांचे नुकसान होत असून, महाविद्यालयीन स्तरावर शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी व बायोमेट्रिक हजेरी यंत्रणेसाठी वापरल्या जाणाऱ्या शासकीय निधी व नियमांची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, खासगी शिकवणी वर्ग नियंत्रणासाठी शिक्षण विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या कायद्याच्या मसुद्याला मंजुरी मिळण्यात होत असलेल्या विलंबाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने सदर खासगी शिकवणी वर्ग नियंत्रणासाठी शिक्षण विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या कायद्याच्या मसुद्याला मंजुरी मिळण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली तसेच ‘इंटिग्रेटेड’ पध्दतीतील अनियमितता रोखण्यासाठी, विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती सुनिश्चित करण्यासाठी व खासगी शिकवणी वर्गांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी शासन कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे अंशत: खरे आहे.

विभागाच्या दिनांक १५/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व खासगी अनुदानित/विनाअनुदानित/अंशत: अनुदानित/ स्वंयअर्थसहाय्यित कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रिक पध्दतीने सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने सर्व शाखांच्या कनिष्ठ महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रिक पध्दतीने घेण्याबाबतच्या सुचना मा.मंत्री महोदय यांनी दिल्या आहेत
(५) व (६) श्री.सुखदेब सहा यांनी मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे आंध्रप्रदेश सरकार विरोधात दाखल केलेली याचिका प्रकरणी दिनांक २५/०७/२०२५ आदेशान्वये मा.न्यायालयाने निर्गमित केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने विभागाच्या दिनांक ०७/०१/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील शाळांमध्ये तसेच खाजगी शिकवणी वर्गामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण तणाव निर्माण होऊ नये यांकरीता प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्याकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय निरीक्षण समिती स्थापन करण्यात आल्या आहेत तसेच खाजगी शिकवणी वर्गाकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाने दिनांक १६/०१/२०२४ रोजी निर्गमित केलेल्या मागदर्शक सूचना व तसेच देशातील अन्य राज्यांनी खाजगी शिकवणी वर्गांकरीता तयार केलेले अधिनियम/नियम यातील तरतुदी विचारात घेवून राज्यातील खाजगी शिकवणी वर्गाकरीता सर्व समावेश “खाजगी शिकवणी (विनियमन) अधिनियम, २०२६” तयार करण्याची कार्यवाही विभागस्तरावर करण्यात येत आहे.

-----------------

## माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांच्या नियुक्त्या करताना नियमबाह्य पध्दतीने वयोमर्यादेची अट घालण्यात येत असल्याबाबत

**(२५) * ९१४१ श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवा शर्ती नियमावली, १९८१ मधील नियम ९ (४)(ब) मध्ये माध्यमिक शाळांतील कर्मचारी नियुक्तीसाठी कोणतीही कमाल वयोमर्यादा स्पष्टपणे नमूद केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही क्षेत्रिय अधिकारी संस्थाअंतर्गत करण्यात आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तींना मान्यता देताना कमाल वयोमर्यादेची अतिरिक्त अट घालत असल्याने, क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवा शर्ती नियमावली, १९८१ मधील नियम ९ (४)(ब) च्या तरतुदींचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या अटी) अधिनियम, १९७७ व त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या १९८१ च्या नियमावलीतील नियम ९ (४)(ब) नुसारच नियुक्तींना मान्यता देण्याबाबत सर्व क्षेत्रिय अधिकारी, शिक्षणाधिकारी व संबंधित प्राधिकरणांना निर्देश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच नियमावलीमध्ये नसलेल्या अटी लावून नियुक्ती मान्यता प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या अथवा नाकारणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी मधील प्राप्त गुणांच्या आधारे पवित्र पोर्टलमार्फत केल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळातील शिक्षक पदभरतीसाठी उच्च वयोमर्यादा विहित करण्यात आलेली नाही. विहित वयोमर्यादा ओलांडल्याच्या कारणावरुन माध्यमिक शाळांमधील शिक्षक पदभरतीसाठी उमेदवारास अपात्र ठरविण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यापीठांमध्ये आदिवासी अध्ययन व संशोधन केंद्रांची स्थापना करण्याबाबत

**(२६) * १००८१ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, संशोधन व शैक्षणिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच आदिवासी समाजाच्या इतिहास, संस्कृती, भाषा, परंपरा व सामाजिक प्रश्नांच्या अभ्यासाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध विद्यापीठांमध्ये आदिवासी अध्ययन व संशोधन केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे मे,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही विद्यापीठांमध्ये आदिवासी अध्ययन, लोकसंस्कृती, सामाजिक संशोधन अथवा आदिवासी विकासाशी संबंधित अध्ययन केंद्रे कार्यरत असून अमरावती व गडचिरोली येथील विद्यापीठांमध्ये स्वतंत्र आदिवासी अध्ययन व संशोधन केंद्र स्थापन करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण, संशोधन, कौशल्यविकास व स्पर्धात्मक संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनामार्फत कोणत्या विशेष योजना राबविण्यात येत आहेत तसेच मागील तीन वर्षांमध्ये या योजनांद्वारे मोठ्या संख्येने आदिवासी विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे,

(४) असल्यास, आदिवासी अध्ययन व संशोधन केंद्रांच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या इतिहास, संस्कृती, भाषा लोकपरंपरा, सामाजिक व आर्थिक प्रश्नांवरील अभ्यास व संशोधनाला चालना देण्यासाठी तसेच संबंधित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, संशोधन सहाय्य व रोजगाराभिमुख प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) उपरोक्त आदिवासी अध्यासन केंद्रांच्या माध्यमातून चाली रीती, भाषा, रूढी, परंपरा संस्कृती यांचा अभ्यास व संशोधनावर भर देण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बारावीच्या विविध परीक्षा केंद्रावरील सामुहिक कॉपीच्या गैरप्रकारांची चौकशी करण्याबाबत

**(२७) * ९७३३ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मंडळामार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेदरम्यान काही परीक्षा केंद्रांवर सामूहिक कॉपी तसेच इतर गैरप्रकार घडल्यामुळे या प्रकरणांमध्ये संबंधित परीक्षा केंद्रांवरील जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात आली असून, सुमारे १०० कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली असल्याची बाब माहे मे, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध परीक्षा केंद्रांवर घडलेल्या गैरप्रकारांच्या संदर्भात संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये एकूण १५ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यामध्ये अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर व लातूर विभागांतील प्रकरणांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून प्राप्त माहितीनुसार, सन २०२६ च्या बारावी परीक्षेदरम्यान सामूहिक कॉपीची एकूण १,४६९ प्रकरणे नोंदविण्यात आली असून, त्यापैकी सर्वाधिक प्रकरणे ६५० प्रकरणे अमरावती व ५०१ प्रकरणे छत्रपती संभाजीनगर विभागात आढळून आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ‘कॉपीमुक्त अभियान’ राबवूनही ९० टक्के वर्गांमध्ये बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखरेखीत इतक्या मोठ्या प्रमाणावर परीक्षा केंद्रांवर गैरप्रकारांना साथ देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर केवळ निलंबनाची कारवाई पुरेशी नसून, तर विभागीय चौकशी, सेवा नियमांनुसार कठोर शिस्तभंग कारवाई तसेच आवश्यकतेनुसार फौजदारी कारवाई करण्यात यावी व अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि

भविष्यात परीक्षांची विश्वासार्हता जपण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

यावर्षी पार पडलेल्या इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षांमध्ये सामुहीक कॉपी व इतर गैरप्रकार घडल्यामुळे एकूण १०० कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेदरम्यान विविध परीक्षा केंद्रांवर घडलेल्या गैरप्रकारांप्रकरणी एकूण १५ गुन्हे (एफआयआर) दाखल करण्यात आले असून त्यामध्ये अमरावती विभागातील ८, नागपूर विभागातील ३. छत्रपती संभाजीनगर विभागातील ३ तसेच लातूर विभागातील १ प्रकरणाचा समावेश आहे.
(३) हे खरे आहे.
(४) इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त व निकोप वातावरणात होण्यासाठी गतवर्षी प्रमाणे यावर्षी देखिल राज्यात कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबविण्यात आलेले आहे.
• बोर्ड परीक्षांचे आयोजन गुणवत्ता पूर्ण व सुरक्षित वातावरणात होण्यासाठी तसेच जिल्हास्तरावरील नियंत्रण व समन्वयासाठी दिनांक ९ जानेवारी, २०२६ च्या शासन निर्णयान्वये दक्षता समितींची पुर्नरचना करण्यात आली असून दक्षता समितीचे जबाबदारी व कार्य निश्चित करण्यात आले आहे.
• कॉपीमुक्त परीक्षा अभियानासाठी परीक्षा केंद्रावर निगराणीसाठी जिल्हा दक्षता समितीमार्फत भरारी पथकांची नियुक्ती केली जाते. तसेच सदर पथकाने विविध परीक्षा केंद्रांवर आकस्मिक दौऱ्याचे आयोजन करणे व गैरप्रकार आढळल्यास तात्काळ संबंधितांविरुध्द कार्यवाही करणे अशा सुचना देण्यात आलेले होते.
• जे परीक्षा केंद्र कॉपी प्रकरणाबाबत संवेदनशील आहेत, तेथे बैठे पथक नियुक्त करण्यात आलेली होती. परीक्षा केंद्रावर सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करण्यात आली. परीक्षेशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना परीक्षा केंद्रावर येण्यास प्रतिबंध करण्यात आले होते.
• उपद्रवी व संवेदनशील केंद्राची माहिती जिल्हाधिकारी यांनी प्राप्त करुन व या केंद्रावर विशेष लक्ष द्यावे तसेच पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात यावा अश्या सुचना देण्यात आल्या होत्या.
• अतिसंवेदनशील परीक्षा केंद्रावर तसेच केंद्राभोवताली पोलीस प्रशासनाकडे उपलब्ध असलेल्या "ड्रोन" च्या सहाय्याने निगराणी ठेवण्यात आली होती.
• कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळल्यास जबाबदार व्यक्तिस तात्काळ पोलीस प्रशासनाच्या हवाली करण्यात यावे व त्यांच्यावर Maharashtra Prevention of Malpractices Act १९८२ व भारतीय न्याय संहितेतील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास कळविण्यात आले होते.
• तसेच जून-जुलै, २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेकरीता भूगोल या विषयासाठी पुणे जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्वावर प्रश्नपत्रिका वितरण प्रणाली तसेच उत्तरपत्रिका स्कॅनिंग व ऑन स्क्रिन मार्किंग सिस्टीमद्वारे तपासण्यात येणार आहेत. त्यामुळे उत्तरपत्रिका तपासणी व निकाल प्रक्रिया गतीने पूर्ण होईल व गैरमार्गाला आळा बसेल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडी बाजार पुन्हा सुरू करण्याबाबत

**(२८) * १०१८८ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये शेतकरी ते थेट ग्राहक या संकल्पनेअंतर्गत भाजीपाला, फळे व अन्य कृषीमालाची विक्री करण्यासाठी सुरू करण्यात आलेले संत शिरोमणी सावता माळी शेतकरी आठवडी बाजार अनेक ठिकाणी बंद असल्याची बाब माहे मे, २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संत शिरोमणी सावता माळी आठवडे बाजार बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना आपला भाजीपाला व शेतमाल थेट ग्राहकांपर्यंत विक्री करण्यास अडचणी निर्माण होत असल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत असून सदर बाजार कार्यरत नसल्यामुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल मध्यस्थांमार्फत किंवा स्थानिक बाजारात कमी दराने विकावा लागत असून त्यामुळे शेतमालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संत शिरोमणी सावता माळी शेतकरी आठवडी बाजार बंद पडण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीच्या अनुषंगाने संत शिरोमणी सावता माळी आठवडे बाजार बंद असण्यास संबंधित बाजारांच्या व्यवस्थापनातील त्रुटी, निष्काळजीपणा किंवा अनियमिततेस जबाबदार असलेल्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१), (२), (३) व (४) शहरी भागात ग्राहकांना ताजी फळे व भाजीपाला वाजवी दरात उपलब्ध व्हावा व शेतकऱ्यांना चांगला भाव मिळावा यासाठी संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडी बाजार अभियान राबविण्यास दिनांक १२/०८/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, नगरविकास विभागाने देखील दिनांक २४/०८/२०१६ च्या परिपत्रकान्वये शेतकऱ्यांना त्यांचे भाज्या, फळे, अन्नधान्य आणि इतर कृषी उत्पादने थेट विक्रीसाठी महानगरपालिका/नगरपालिका यांनी त्यांच्या भाजीमंडईत, तसेच नगरपालिका क्षेत्रात किमान एक मैदान व महानगरपालिका क्षेत्रात ३ ते ४ मैदाने दर शनिवारी किंवा रविवारी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच शेतकरी बाजाराकरीता आच्छादन काढून टाकता येणाऱ्या शेड उभारण्याबाबत तसेच शेतकरी बाजाराबाबत जनजागृती करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

राज्यात अनेक ठिकाणी शेतकरी उत्पादक संस्थामार्फत आठवडी बाजार चालविण्यात येत आहेत. तथापि, नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिकेमध्ये आठवडी बाजारासाठी जागा उपलब्ध होण्यास अनेकदा विलंब होतो. यासाठी नगरविकास विभागाने दिनांक १२/०८/२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना सर्व महानगरपालिका आयुक्त तसेच, नगरपरिषद संचालनालय यांच्यामार्फत नगरपरिषदा व नगरपालिका यांच्या निदर्शनास आणुन त्यांना शेतकरी आठवडी बाजाराकरीता सर्वतोपरी सहकार्य करण्याबाबत शासन स्तरावरुन सूचित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कासारी-मुचकुंदी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पाचे काम पुर्वानुभव नसलेल्या कंपनीला दिल्याबाबत

**(२९) * १०४४३ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासारी-मुचकुंदी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) जलविद्युत प्रकल्पाची क्षमता सुमारे १७५० मेगावॅट असून, सुमारे रुपये ६,७०० कोटींची गुंतवणूक प्रस्तावित आहे तसेच सदर प्रकल्पासाठी शासनाने खासगी गुंतवणुकीच्या माध्यमातून सामंजस्य करार (MoU) केला असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा. लि., पुणे या कंपनीची निवड करण्यात आली असून, या कंपनीविरोधात विविध कामांमधील अनियमितता, रॉयल्टी थकबाकी, प्रलंबित चौकशा तसेच इतर आक्षेपांबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असून जिल्हा जलसंधारण अधिकारी, रत्नागिरी यांच्या अखत्यारीतील सन २००९ ते २०१३ या कालावधीत कंपनीस देण्यात आलेल्या १२ धरण प्रकल्पांपैकी अनेक कामे अद्याप अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीला जलविद्युत प्रकल्पांची उभारणी व संचालनाचा पूर्वानुभव नसतानाही व लोकायुक्तांनी दिलेल्या निर्देशांबाबत आक्षेप नोंदविण्यात आले असूनही रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यात प्रस्तावित असलेला कासारी-मुचकुंदी सुमारे १७५० मेगावॅट क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कंपनीबरोबर केलेल्या करारनाम्यामुळे शासनाची विश्वासार्हता व प्रतिमा याबाबत शंका निर्माण होत असल्यामुळे कासारी-मुचकुंदी जलविद्युत प्रकल्पासाठी संबंधित कंपनीची पात्रता, तांत्रिक क्षमता, आर्थिक क्षमता व कामगिरी यांचे स्वतंत्र मूल्यमापन करण्यात येऊन सदर कंपनीविषयी उपस्थित करण्यात आलेल्या आक्षेपांची सखोल चौकशी करून कंपनीबरोबर केलेला करारनामा रद्द करण्याबाबत दुसऱ्या कंपनीकडे सदर प्रकल्प हस्तांतरण करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.

जलसंपदा विभाग, शासन निर्णय दिनांक २०/१२/२०२३ व शासन शुद्धिपत्रक दिनांक ३१/०७/२०२४ अन्वये सार्वजनिक खाजगी भागीदारीद्वारे उदंचन जलविद्युत प्रकल्प (PSP) आणि सह:स्थित उदंचन जलविद्युत प्रकल्प सौर / इतर अपारंपारीक संकरित प्रकल्पांच्या विकसनासाठीचे शासन धोरण निर्गमित करण्यात आले आहे. या धोरणांतर्गत वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने कोल्हापूर आणि रत्नागिरी जिल्ह्यातील कासारी मुचकुंदी (१७५० मे.वॅ) या प्रस्तावित उदंचन जलविद्युत प्रकल्पाकरीता दिनांक १५/०७/२०२५ रोजी प्रकल्पाचे सर्वेक्षण, अन्वेषण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता धोरणाच्या श्रेणी-२ अंतर्गत जलसंपदा विभागासोबत सामंजस्य करार केलेला आहे. सदर करारानुसार प्रकल्पासाठी अंदाजित रुपये ६७०० कोटींची गुंतवणूक विकासकामार्फत उभारण्यात

येणार असून या प्रकल्पामूळे सुमारे १६०० मनुष्य दिन रोजगारनिर्मिती मधून १७५० मे.वॅ. विद्युत निर्मिती प्रस्तावित आहे.

(२) होय. हे अंशत: खरे आहे.

कासारी मुचकुंदी उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठीचा सामंजस्य करार हा जलसंपदा विभागाबरोबर सर्वेक्षण, अन्वेषण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी करण्यात आला आहे.

मृद व जलसंधारण विभागाकडील रत्नागिरी विभागांतर्गत वॉटर फ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा. लि., पुणे या कंपनीमार्फत सिंधुदूर्ग जिल्ह्यात ८ व रत्नागिरी जिल्ह्यात २ अशा एकूण १० प्रकल्पांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. त्यापैकी सिंधुदूर्ग जिल्ह्यातील ४ कामे अद्याप सुरू झालेली नाहीत. तसेच उर्वरित ६ प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

या कंपनीविरोधात विविध कामांमधील अनियमितता, रॉयल्टी थकबाकी, प्रलंबित चौकशा तसेच इतर आक्षेपांबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने वॉटरफ्रंट प्रा.लि. कंपनी, पुणे तसेच महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचेमार्फत झालेल्या कामांची चौकशी करण्यासाठी मृद व जलसंधारण विभागाच्या दिनांक ०५ मार्च, २०२६ च्या शासन निर्णयान्वये विशेष चौकशी पथक (एसआयटी) गठीत करण्यात आली आहे व सदर चौकशी प्रगतीपथावर आहे.

(३) हे खरे नाही.

प्रस्तावित कासारी मुचकुंदी उदंचन जलविद्युत प्रकल्पाबाबत लोक आयुक्त यांनी जलसंपदा विभागास कुठलेही निर्देश दिलेले नाहीत.

जलसंपदा विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक २०/१२/२०२३ रोजीच्या धोरणातील तरतुदींनुसार श्रेणी-२ अंतर्गत केंद्रशासन / केंद्रशासन अंगीकृत उपक्रम /खाजगी विकासक यांनी शोधलेल्या व प्रस्तावित केलेल्या प्रकल्पांचा समावेश करण्यात आलेला असून सदर प्रकल्प विकासकास सर्वेक्षण, अन्वेषण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी देण्याचे धोरणात प्रावधान आहे. यास अनुसरुन जलसंपदा विभागाने दिनांक १५/०७/२०२५ रोजी सदर कंपनीसोबत सामंजस्य करार केलेला आहे. कासारी मुचकुंदी उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी संपूर्ण खर्च हा विकासकामार्फत करण्यात येणार असून शासनाचा कुठलाही खर्च होणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंशतः टप्पा अनुदानित शिक्षकांच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गतची रक्कम त्यांच्या प्रत्यक्ष टप्पा अनुदानानुसार कपात करण्याबाबत

**(३०) * १०२३६ अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंशतः टप्पा अनुदानित (२०%, ४०%, ६०%, ८०%) शाळांतील शिक्षकांच्या वेतनासाठी शासनाकडून मंजूर अनुदानाच्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जातो, नवीन पेन्शन योजना (NPS) अंतर्गत कपात १००% अनुदान प्राप्त झाल्यानंतरच सुरू करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानित शाळांमधील अनेक शिक्षकांनी विनाअनुदानित अथवा अंशतः अनुदानित तत्त्वावर दीर्घ कालावधी सेवा बजावलेली आहे. त्यामुळे NPS अंतर्गत योगदान सुरू होण्यापूर्वीचा सेवाकाल NPS साठी ग्राह्य धरला जात नसल्याने संबंधित शिक्षक संघटनांनी निवृत्तीनंतरच्या आर्थिक सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंशतः टप्पा अनुदानित शिक्षकांच्या बाबतीत त्यांच्या अनुदानाच्या टप्प्यानुसार (२०%, ४०%, ६०%, ८०%) NPS कपात त्यांच्या प्रत्यक्ष टप्पा अनुदानाच्या प्रमाणात सुरू करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंशतः टप्पा अनुदानित शिक्षकांच्या बाबतीत त्यांच्या अनुदानाच्या टप्प्यानुसार NPS कपात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२००५ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या सेवेत दिनांक १/११/२००५ रोजी किंवा तद्नंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू करण्यात आली आहे. या अनुषंगाने वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२००५ च्या शासन निर्णयाच्या धर्तीवर शालेय शिक्षण विभागाने दिनांक २९/११/२०१० च्या शासन निर्णयान्वये मान्यता व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्थांच्या सेवेमधील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर १००% अनुदानित पदावर नियुक्त होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीची विस्तुत कार्यपध्दती विहित केलेली आहे. सदर शासन निर्णयाविरुध्द विविध न्यायालयीन प्रकरणे मा.उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर व औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेली होती. सदर रिट याचिकांवरती मा.न्यायालयाने दिनांक ३०/०४/२०१९ व दिनांक २६/०८/२०१९ रोजी मार्गदर्शक निर्णय दिला आहे. त्यानुसार सदर शासन निर्णय न्यायोचित आहेत. त्यानुसार शिक्षक १००% अनुदानित पदावर आल्यानंतर निवृत्तीवेतन योजनेस पात्र ठरतो.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समग्र शिक्षा अभियानांतर्गत कार्यरत व्यवसाय शिक्षकांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत

**(३१)** * **९११६ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सन २०१५-१६ पासून समग्र शिक्षा अभियानांतर्गत शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सुमारे ८६५ शाळांमध्ये राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (NSDC) मार्फत व्यवसाय शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियुक्त्या प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आल्या असून, योजना यशस्वी ठरल्यास संबंधित व्यवसाय शिक्षकांना टप्प्याटप्प्याने शासन सेवेत सामावून घेण्याबाबत आश्वासन देण्यात आले होते, तसेच दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान आंदोलन करणाऱ्या व्यवसाय शिक्षकांच्या प्रतिनिधींशी झालेल्या चर्चेमध्ये संबंधित शिक्षकांना टप्प्याटप्प्याने कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (DVET) अंतर्गत कार्यरत शिक्षकांना नियमित वेतनश्रेणी, भत्ते, निवृत्तीवेतन व इतर सेवा-सुविधा उपलब्ध होत असताना, समग्र शिक्षा अंतर्गत कार्यरत व्यवसाय शिक्षकांना गेल्या दहा वर्षांपासून अत्यल्प मानधनावर व कंत्राटी स्वरूपात काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्रातील समग्र शिक्षा अंतर्गत शैक्षणिक क्षेत्रात २०१५-१६ पासून कार्यरत व्यवसाय शिक्षकांना आसाम राज्याच्या धर्तीवर कायमस्वरूपी सेवेत सामावून घेणे, समान कामास समान वेतन लागू करणे, सेवा संरक्षण देणे व नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण संस्थांमार्फत व्यवसाय शिक्षकांची नियुक्ती करण्यात येते. सदर व्यवसाय प्रशिक्षण संस्था ह्या राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (NSDC) या संस्थेच्या मान्यता प्राप्त असून NSDC संस्थेकडून सदर प्रशिक्षण संस्थांची निवड करुन त्यांच्यामार्फत व्यवसाय शिक्षण उपक्रम राबविले जाते.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेमार्फत व्यवसाय प्रशिक्षण संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवड केलेल्या संस्थामार्फत मंजूर असलेल्या सर्व शाळांमध्ये व्यवसाय शिक्षण उपक्रम राबविण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षकांची नियुक्ती ही व्यवसाय प्रशिक्षण संस्थांमार्फत (त्रयस्थ संस्थाद्वारे) करण्यात येत असल्याने, व्यवसाय प्रशिक्षकांना सेवेत सामावून घेण्याबाबत नियमानुसार कोणतीही तरतूद नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: नागपूर विभागातील समाजकार्य महाविद्यायातील कर्मचाऱ्यांच्या नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेचा व्याजासह भरणा करण्याबाबत

**(३२) * ८८९३ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः नागपूर विभागातील समाजकार्य महाविद्यालयांतील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त झालेल्या अनेक कर्मचाऱ्यांची डी.सी.पी.एस. (परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना) खाती

प्रशासकीय स्तरावर विलंबामुळे अद्यापही उघडण्यात आली नसल्याने १९ ते २० वर्षांची सेवा झालेले कर्मचारी सदर योजनेच्या लाभापासून वंचित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेला हिस्सा आणि शासनाचा समतुल्य हिस्सा, त्यांच्या नियुक्ती दिनांकापासून व्याजासह डी.सी.पी.एस. (परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना) खात्यात जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २९/१०/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार, राज्यातील अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालयातील दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू करण्यात आली आहे.

तद्नंतर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ०४/१२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार, समाजकार्य महाविद्यालयांतील सदरहू दिनांक ०१/११/२००५ नंतर नियुक्त झालेल्या नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू असणाऱ्या कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करण्यात आली आहे.

समाजकार्य महाविद्यालयात दिनांक ०१/११/२००५ नंतर एकूण ५०४ कर्मचारी नियुक्त झालेले असून, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून ३७९ आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून ११२ अशा एकूण ४९१ कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) क्रमांक देण्यात आले आहेत. १३ कर्मचाऱ्यांना वयाधिक्य व नियुक्ती विहित मार्गाने झालेली नसणे या कारणास्तव अद्याप डीसीपीएस क्रमांक देण्यात आलेले नाहीत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २९/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये, समाजकार्य महाविद्यालये (बी.एस.डब्ल्यु/ एम.एस.डब्ल्यु. अभ्यासक्रम) हा विषय या विभागाकडे हस्तांतरीत झाला आहे.

नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन (DCPS) योजनेच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांचे व शासनाचे अंशदान नियमितपणे जमा करण्यात आलेले नसणे, काही प्रकरणांत केवळ कर्मचारी अंशदान कपात केले असून शासन समतुल्य हिस्सा जमा न होणे, तसेच काही संस्थांनी डीसीपीएस क्रमांक उपलब्ध करून दिले असले, तरी अंशदान कपात केलेली नसणे, या बाबी निदर्शनास आल्याने, समाजकल्याण आयुक्तालयाकडून डी.सी.पी.एस. अंशदानासाठी कपात केलेल्या रकमांचा कोषागाराशी ताळमेळ घेण्याच्या अनुषंगाने उच्च शिक्षण संचालनालयाकडून उपायुक्त, समाज कल्याण आणि संबंधितांसोबत दिनांक ०६/११/२०२५ व दिनांक ०७/११/२०२५ रोजी बैठका आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तसेच याबाबत संचालनालय व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडून सहाय्यक आयुक्त समाजकल्याण यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाकडून डीसीपीएस क्रमांक दिलेल्या ४९१ कर्मचाऱ्यापैकी १२६ कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत (NPS) मध्ये समावेश करुन PRAN क्रमांक देण्यात आलेले आहेत. उर्वरित ३६५ कर्मचाऱ्यांबाबतची एन.एस.डी.एल. व सेवार्थ प्रणाली मॅपिंग करण्याची कार्यवाही महाआयटीकडून पूर्ण झाल्यानंतर, सदर कर्मचाऱ्यांना PRAN क्रमांक देण्यात येणार आहेत. **तद्नंतर** PRAN क्रमांक देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांबाबत त्यांच्या वेतनातून चालू महिन्याचे अंशदान व प्रलंबित अंशदान कपात करण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही उच्च शिक्षण संचालनालयाकडून करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमधील क्रीडा शिक्षकांची रिक्त पदे पवित्र पोर्टलद्वारे भरण्याबाबत

**(३३)** * **९६२२ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण व्यवस्थेमध्ये गत २० वर्षांपासून क्रीडा शिक्षक भरतीकडे दुर्लक्ष झाल्याच्या निषेधार्थ पात्र बेरोजगार बी.पी.एड. व एम.पी.एड. पदवीधरांनी दिनांक २७ एप्रिल, २०२६ पासून मुंबई येथील आझाद मैदानावर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून क्रीडा शिक्षकांची रिक्त पदे दीर्घकाळ न भरल्यामुळे राज्यातील हजारो बी.पी.एड. व एम.पी.एड. पात्रताधारक युवक बेरोजगार झाले असून विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व सर्वांगीण विकासावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक शाळांमध्ये रिक्त क्रीडा शिक्षक पदांवर इतर विषयांच्या शिक्षकांचे समायोजन करण्यात येत असून ते विद्यमान नियम व शैक्षणिक निकषांच्या विरोधात असल्यामुळे क्रीडा शिक्षणाचा दर्जा खालावत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील क्रीडा शिक्षकांची १०० टक्के रिक्त पदे ‘पवित्र’ पोर्टलद्वारे पारदर्शक पध्दतीने भरण्यात यावीत तसेच ‘TET-२०२५’ अंतर्गत प्रलंबित भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी संबंधित आंदोलकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशीच्या अनुषंगाने क्रीडा शिक्षक भरती प्रक्रिया गतीमान करुन क्रीडा शिक्षक भरतीबाबत कोणती कार्यवाही केली तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने प्रत्येक शाळेत क्रीडा शिक्षक नियुक्ती अनिवार्य करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) क्रीडा शिक्षक पदभरतीच्या अनुषंगाने आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत धरणे आंदोलन करण्याबाबत एका संघटनेचे निवेदन प्राप्त झाले होते.

(२) व (३) शासन निर्णय, दिनांक १५/०३/२०२४ अन्वये क्रीडा शिक्षकांची पदे प्रथमत:च संचमान्यतेत स्वतंत्रपणे उपलब्ध झाली आहेत. त्यामुळे इतर विषयांच्या शिक्षकांचे रिक्त क्रीडा शिक्षक पदावर समायोजन करता येणार नाही. शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी-२०२५ च्या आधारे पवित्र पोर्टलमार्फत

शिक्षक पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. ज्या शाळांना संचमान्यतेनुसार क्रीडा शिक्षकांची पदे उपलब्ध होत आहेत, अशा शाळांनी पोर्टलवर जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्यानुसार नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांची शिफारस केली जाईल.

शाळांमधील क्रीडा शिक्षकांशिवाय जिल्हा परिषदांच्या केंद्र शाळा स्तरावर एक याप्रमाणे राज्यात एकूण ४८६० पदे क्रीडा शिक्षक संवर्गात निर्माण करण्यात आली आहेत. या केंद्रस्तरीय क्रीडा शिक्षक पदाच्या सेवाशर्ती व सेवाप्रवेश नियम अंतिम करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी-२०२५ च्या आधारे पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक पदभरतीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. जाहिरात स्विकारण्याची अंतिम मुदत दिनांक ३०/०६/२०२६ अशी असून त्यानंतर पात्र उमेदवारांच्या नियुक्तीसाठी शिफारशी करण्यात येतील.

(५) क्रीडा शिक्षक भरतीबाबत शासन करीत असलेल्या कार्यवाहीचा तपशिल वर उल्लेख करण्यात आल्याप्रमाणे आहे. याशिवाय ज्या शाळांची पटसंख्या (६ वी ते ८ वी) १०० किंवा त्यापेक्षा अधिक आहे अशा शाळांमध्ये कला, क्रीडा, कार्यानुभव अशी ३ अंशकालीन निर्देशकांची पदे तासिका तत्वावर निश्चित करण्यात आलेली आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना नियमित क्रीडा प्रशिक्षण/शिक्षण उपलब्ध होत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी शाळांमध्ये २५ टक्के आरक्षित जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्काची कोट्यवधी रुपयांची थकबाकी अदा करण्याबाबत

**(३४)** * **१०४४८ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ८,००० हून अधिक खाजगी शाळांमध्ये २५ टक्के आरक्षित जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्काची सुमारे ३,००० कोटी रुपयांची प्रतिपूर्ती शासनाकडून अद्याप प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'समर्थन'या संस्थेने दिनांक ८ मे, २०२६ रोजी पत्राद्वारे विविध शाळा व्यवस्थापन संघटना व संस्थांकडून शासनास निवेदने प्राप्त झाली असून, एका विद्यार्थ्यामागे १७,६७० रुपये प्रतिपूर्ती देण्याचे ठरले असतानाही प्रति विद्यार्थी निर्धारित प्रतिपूर्ती रक्कम वेळेवर प्राप्त होत नसल्यामुळे शाळांवर आर्थिक ताण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२५-२६ या वर्षासाठी RTE शुल्क प्रतिपूर्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार टप्प्याटप्प्याने निधी वितरित करण्याची कार्यवाही करण्यात आली असतानाही, प्रत्यक्षात थकबाकी पूर्णपणे संपलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, RTE शुल्क प्रतिपूर्तीची थकबाकी वेळेत न मिळाल्यास पुढील वर्षापासून 'आरटीई' अंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबविणे कठीण होईल, असा इशारा शाळांच्या संघटनांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रलंबित ३,००० कोटी रुपयांची शुल्क प्रतिपूर्तीची थकीत रक्कम शाळांना शक्य तितक्या लवकर अदा करण्यासाठी शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच सदर शुल्क प्रतिपूर्तीची प्रक्रिया कालबध्द (Time-bound) करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) आरटीई अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी दिनांक १२/०२/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक खर्च शुल्क प्रतिपूर्तीचा दर निश्चित करण्यात आलेला आहे. सदर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत विविध शाळा व संघटनांकडून निवेदने प्राप्त झालेली आहेत.

सन २०१२-१३ पासून २०२५-२६ पर्यंत राज्य शासनाने शैक्षणिक खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रुपये २०२७.३० कोटी इतका निधी संबंधित शाळांना अदा केलेला आहे.
(४) व (५) RTE शुल्क प्रतिपूर्तीची थकबाकी वेळेत न मिळाल्यास पुढील वर्षापासून "आरटीई" अंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबविणे कठीण होईल, असे "समर्थन" या संघटनेच्या निवेदनात नमूद आहे. आरटीई अंतर्गत प्रलंबित प्रतिपूर्ती अदा करण्यासंदर्भात वित्त विभागाकडे पुरवणी मागणीद्वारे निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात येत असते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.